दैनिक
# लोकविजय
संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

## निम्म्या राज्यावर दुष्काळाची छाया, अठ्ठावीस जिल्ह्यांत सरासरीपेक्षा कमी पाऊस

मुंबई दि.१ (प्रतिनिधी)- मोसमी पावसाच्या दुसऱ्या हंगामातील उत्तरार्धातही राज्यातील बहुतांश जिल्ह्यांत पावसाची तूट कायम आहे. त्यामुळे निम्मा महाराष्ट्र दुष्काळाच्या सावटाखाली आहे. त्यात विदर्भ आणि मराठवाड्यातील बहुतांश जिल्ह्यांचा समावेश असून मोसमी पावसाच्या सुरुवातीपासूनच या भागात पावसाची तूट निर्माण झाली होती. त्यामुळे येथील शेतकरी संकटात सापडले असून सप्टेंबर महिन्यात दिलासादायक पाऊस होईल का याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात काही भागात पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज आहे. यंदा प्रशांत महासागरातील 'एल निनो' स्थितीचा प्रभाव मोसमी पावसाच्या हंगामावर आहे. 'एल निनो' स्थितीची तीव्रता पुढील काही महिन्यात वाढेल, असा अंदाज हवामान विभागाने यापूर्वीच व्यक्त केला आहे. संपूर्ण देशात १४ टक्के इतकी पावसाची तूट आहे, तर राज्यात ऑगस्ट महिन्यात सरासरी पावसाहून ११ टक्के कमी पावसाची नोंद झाली आहे. दरम्यान, मराठवाडा, विदर्भातील बहुतांश, तर मध्य महाष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये हंगामाच्या सुरुवातीपासूनच पावसाची तूट असून ऑगस्ट महिन्यात पावसाने ओढ दिल्याने या प्रदेशातील तूट वाढली आहे. त्यामुळे बहुतांश जिल्ह्यात दुष्काळसदृश्य स्थिती आहे. अनेक भागात टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे. आतापर्यंत या हंगामात (१ जून ते ३१ ऑगस्ट) राज्यातील १९ जिल्ह्यांत २० टक्क्यांपेक्षा अधिक तूट आहे, तर ८ जिल्ह्यांमध्ये २० टक्क्यांपेक्षा कमी तूट आहे. मात्र, मोसमी पावसाचा उर्वरित हंगाम खडतर असू शकतो, असा हवामान अभ्यासकांचा अंदाज आहे.

(वर्ष ६५ वे अंक २२१) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) बुधवार, दि.०२ सप्टेंबर २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)

# नीट आंदोलक विद्यार्थ्यांवरील गुन्हे मागे

## सर्वोच्च न्यायालयाकडून दिलासा

नवी दिल्ली दि.१ (वृत्तसंस्था)- नीट पेपरफुटीप्रकरणी कॉक्रोच जनता पार्टीने २० जुलै रोजी संसद मोर्चाचं आयोजन केलं होतं. तत्कालीन शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी हा मोर्चा आयोजित केला होता. या दरम्यान, पोलीस आणि आंदोलकांमध्ये झटापट होऊन हिंसाचार झाला. याप्रकरणी दिल्ली पोलिसांनी आंदोलकांवर गुन्हे दाखल केले. हे गुन्हे आता सर्वोच्च न्यायालयाने मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली.

सर्वोच्च न्यायालयाने जुलै महिन्यातील विद्यार्थी आंदोलनांशी संबंधित सर्व एफआयआर रद्द करण्यासाठी, संविधानाच्या कलम १४२ अंतर्गत संपूर्ण न्याय देण्यासाठी आपल्या अंगभूत अधिकारांचा वापर केला आहे. इंडियन एक्स्प्रेसने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.

'कॉक्रोच जनता पार्टी'च्या (सीजेपी) वतीने २० जुलै रोजी जंतरमंतर येथे 'संसद चलो' आंदोलनाचे आयोजन करण्यात आले होते. नीटच्या प्रश्नपत्रिका फुटीप्रकरणी तसेच शिक्षण व्यवस्थेतील कथित अनियमिततेच्या निषेधार्थ हे आंदोलन करण्यात आले. आंदोलनानंतर हिंसाचाराच्या घटनांप्रकरणी दिल्ली पोलिसांनी आंदोलनकर्ते विद्यार्थी आणि अन्य व्यक्तींविरोधात अनेक एफआयआर दाखल केले होते. तसंच, देशभरही आंदोलन पुकारण्यात आले होते. या विविध राज्यांमध्ये आंदोलकांवर गुन्हे दाखल करण्यात आले.

या कारवाईविरोधात मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक संताप व्यक्त झाल्यानंतर ३ ऑगस्ट रोजी सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वाचे स्पष्टीकरण दिले होते. आंदोलनाशी संबंधित विद्यार्थ्यांविरोधातील



एफआयआर बंद किंवा मागे घेण्याचा निर्णय संबंधित यंत्रणा घेऊ शकते, असे न्यायालयाने स्पष्ट केले होते. देशव्यापी आंदोलन संपवण्यासाठी सीजेपीच्या नेत्यांशी झालेल्या चर्चेत केंद्र सरकारने एफआयआर मागे घेण्याची अट मान्य केली होती, असा दावा याचिकेत करण्यात आला आहे. त्यामुळे हे गुन्हे मागे घ्यावेत, याकरता केंद्रानेच सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. अखेर दिल्लीसह विविध राज्यातील आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्यात आले आहेत.

## रावेर तालुका भूकंपाच्या धक्क्याने हादरला

जळगाव दि.१ (प्रतिनिधी)- जिल्ह्यातील रावेर तालुक्यात मंगळवारी सकाळी भूकंपाचा सौम्य धक्का जाणवल्याने नागरिकांमध्ये काही काळ खळबळ उडाली. राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राच्या नोंदीनुसार सकाळी ७ वाजून ५७ मिनिटांनी ३.३ रिश्टर स्केल तीव्रतेचा भूकंप नोंदवण्यात आला. भूकंपाचा केंद्रबिंदू जमिनीखाली सुमारे पाच ते दहा किलोमीटर खोलीवर मोहगन बुद्रूक आणि अहिरवाडी गावांच्या परिसरात असल्याचे सांगण्यात आले आहे.

सकाळच्या वेळी अचानक जमिनीला सौम्य हादरा जाणवल्याने काही नागरिकांमध्ये घबराट निर्माण झाली. घरातील वस्तूंना किंचित कंपन जाणवल्याचे काही नागरिकांनी सांगितले.

## एमपीएससी पेपरफुटीत ऋतुजा पाटीलला अटक; पोलिसांची नंदूरबारमधून कारवाई

नंदुरबार दि.१ (प्रतिनिधी)- राज्यातील पेपरफुटी प्रकरणात प्रेमाचा अँगल असल्याचे सांगण्यात येत होते, त्याच प्रेमप्रकरणातून हा पेपर फुटल्याचा दावाही करण्यात आला. मात्र, केवळ प्रेमाचा अँगल दाखवून प्रकरण दाबण्याचा हा प्रकार असल्याचे पेपरफुटी प्रकरणाची तक्रार करणाऱ्या ऋषिकेश गांगुर्डे यांनी म्हटलंय. तसेच, तक्रार देणाऱ्या गौरव पाटील यांनाच पोलिसांनी अटक केल्याचंही त्याने सांगितलं. आता, पेपरफुटी प्रकरणात पोलिसांनी तक्रारदार प्रवीण पाटील याला अटक केल्यानंतर आपला मोर्चा नंदूरबारकडे वळवला आहे. एमपीएससीमार्फत घेण्यात आलेल्या औषध निरीक्षक पदाच्या पेपरफुटी प्रकरणातील मुख्य आरोपी ऋतुजा पाटील यांना मुंबई पोलिसांच्या पथकाने नंदुरबारमधून ताब्यात घेतले. प्राथमिक चौकशीनंतर त्यास अटक करण्यात आली आहे.

एमपीएससी अन्न व औषध निरीक्षक पेपरफुटीप्रकरणात प्रेमाचा अँगल समोर आलो होता. तक्रारदार गौरव पाटील आणि ऋतुजा पाटील यांच्या प्रेम प्रकरणातून हा पेपर फुटल्याचं सांगण्यात येत होतं. मात्र, प्रेमाचा अँगल केवळ प्रकरण दाबण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप दुसरा तक्रारद्रार ऋषिकेश गांगुर्डे याने केला आहे. त्यातच, पोलिसांनी याप्रकरणात गौरव पाटीलला अटक केल्यानंतर आता ऋतुजा पाटीललाही ताब्यात घेऊन चौकशीनंतर अटक करण्यात आली.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या पेपरफुटी प्रकरणात आता मोठी अपडेट समोर आली आहे. ऋतुजा पाटील यांना त्यांच्या ज्ञानदीप सोसायटीतील राहत्या घरातून ताब्यात घेण्यात आले आहे. मुंबई पोलिसांचे पथक आज सकाळपासून नंदुरबारमध्ये दाखल झाले होते. या पथकाकडून नंदुरबारातील विविध ठिकाणी झाडाझडती आणि चौकशी केल्यानंतर अखेर ऋतुजा पाटील यांना अटक करण्यात आली. ऋतुजा पाटील यांना मुंबईतील विशेष गुन्हे शाखेच्या पथकाकडून नंदुरबारहून मुंबईला नेण्यात आले. ऋतुजा पाटील यांच्या अटकेमुळे औषध निरीक्षक पेपरफुटी प्रकरणाच्या तपासाला आता आणखी वेग येण्याची शक्यता आहे. यापूर्वी, पोलिसांनी प्रवीण पाटील यासही अटक केली आहे.

# मनोज जरांगेंची प्रकृती खालावली, उपचार घेण्यास नकार

## मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांबरोबर चर्चा झाली, लवकरच मार्ग काढणार-उदय सामंत

जालना दि.१ (प्रतिनिधी)- मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या अंतरवाली सराटी येथील ११व्या आमरण उपोषणाचा चौथा दिवस आहे. जरांगे यांची प्रकृती खालवली आहे. जालन्याच्या जिल्हाधिकाऱ्यांकडून मनोज जरांगे यांच्या प्रकृतीची विचारपूस करत डॉक्टरांशी चर्चा केली. जरांगे पाटलांनी उपचारासाठी नकार दिला आहे.

मनोज जरांगे पाटील यांच्या आमरण उपोषणाचा आज चौथा दिवस असून, त्यांच्या प्रकृतीकडे सरकारचे लक्ष आहे. मराठा आरक्षणाच्या मागणीवर तोडगा काढण्यासाठी सरकारचे शिष्टमंडळ पुन्हा एकदा मनोज जरांगे पाटील यांची भेट घेण्याची शक्यता आहे. यापूर्वी झालेल्या चर्चेनंतरही आंदोलन सुरूच असल्याने सरकारकडून पुढील चर्चेसाठी हालचाली सुरू



झाल्याचे समोर येत आहे. त्यामुळे या भेटीत काय तोडगा निघतो, याकडे लक्ष लागले आहे.

उपोषणाच्या समर्थनार्थ अंतरवाली सराटीत मराठा बांधवांचे लोंढे सतत दाखल होत आहेत. जालन्याचे खासदार डॉ. कल्याण काळे यांनी जरांगे यांची भेट घेऊन पाठिंबा दिला.

मराठा बांधवांनी आंतरवालीत गर्दी न करता ५-६ सप्टेंबरपासून मुंबईकडे निघावे. मात्र, आझाद मैदानाकडे न जाता मित्र-नातेवाइकांकडे थांबावे, असे आवाहन मनोज जरांगे पाटील यांनी उपोषणाच्या तिसऱ्या दिवशी म्हणजे ३१ऑगस्ट रोजी केले.

मराठा आरक्षण प्रश्नावर शिंदेसेनेचे मंत्री उदय सामंत, भाजप नेते आमदार प्रसाद लाड यांनी पुण्यात मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. त्यानंतर सामंत म्हणाले की, जरांगेंच्या उपोषणाबाबत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री शिंदेंशी चर्चा झाली आहे. जरांगेंशी (पान ४ वर)

### मराठा आंदोलकांनी मंत्री जयकुमार गोरेंचा ताफा अडवला; बीडमध्ये टायर जाळून निषेध

सोलापूर दि.१ (प्रतिनिधी)- अंतरवाली सराटीत मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण सुरू असून आज उपोषणाचा चौथा दिवस आहे. जरांगे पाटलांची तब्येत खालावत असल्याने राज्यभरात मराठा बांधव आक्रमक होत असून आज बीड जिल्ह्यासह धाराशिव आणि सोलापूर जिल्ह्यातही मराठा बांधवांनी शासनाचे लक्ष वेधण्यासाठी वेगळ्या आंदोलनाचा प्रयत्न केला. धाराशिवमध्ये मराठा बांधव सामाजिक न्याय विभागाच्या उंच इमारतीवर चढले होते. तर, सोलापुरात पालकमंत्री जयकुमार गोरेंचा ताफा अडवत मराठा आंदोलकांनी घोषणाबाजी केली. बीड जिल्ह्यात आक्रमक मराठा बांधवांनी रोडवर येऊन टायर जाळले. यावेळी मराठा समाजाला आरक्षण दिले जावे म्हणून जोरादार घोषणाबाजी करण्यात आली.

माढा तालुक्यातील टेभुर्णी येथे चार ते पाच मराठा आंदोलकांनी ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे यांची गाडी अडवून थेट गाडी समोर येऊन गाडी खाली घुसण्याचा प्रयत्न केलाय. यावेळी, पालकमंत्री जयकुमार गोरेसमवेत माढ्याचे माजी खा. रणजितसिंह नाईक निंबाळकर हे देखील गाडीत होते. माजी आमदार बबनराव शिंदेच्या सत्कार सोहळ्याच्या कार्यक्रमासाठी जात असताना मराठा आंदोलकांनी मंत्र्यांचा ताफा अडवत हे आंदोलन केलंय. एक मराठा लाख मराठासह मनोज जरांगे पाटलाच्या समर्थनार्थ घोषणाबाजी करुन गाडी समोर आडवे झोपून गाडी खाली घुसण्याचा प्रयत्न झालाय. या घटनेनंतर जिल्ह्यातील मराठा बांधवात चर्चा सुरू झाली असून पोलीसही सतर्क आहेत. दरम्यान, सोलापुरात पोलिसांनी मंत्र्यांच्या कारसमोर आलेल्या कार्यकर्त्यांना बाजूला केल्यानंतर पालकमंत्र्यांचा ताफा पुढे रवाना झाला.

माढ्याचे माजी आमदार बबन शिंदे यांच्या वाढदिवसाच्या कार्यक्रमाला जाताना जयकुमार गोरेंचा ताफा अडवण्याचा प्रयत्न झाला. त्यानंतर, ते कार्यक्रमस्थळी पोहोचले, यावेळी व्यासपीठावर बसले असता सहाय्यक पोलिस अधीक्षक अंजना कृष्णा यांच्याशी त्यांनी चर्चा केली. ताफा अडवल्यानंतर जयकुमार गोरे अलर्ट मोडवर असल्याचं दिसून आलं, तत्काळ सहाय्यक पोलिस अधीक्षक अंजना कृष्णा यांच्याशी त्यांनी चर्चा कली.

## मुंबईला जाणारा ओबीसींचा मोर्चा पुण्यात रोखला; लक्ष्मण हाके आक्रमक



पुणे दि.१ (प्रतिनिधी)- जरांगे पाटलांच्या कुणबी दाखल्यांच्या मागणीला आव्हान देण्यासाठी ओबीसींनी लक्ष्मण हाकेंच्या नेतृत्वात महाएल्गार मोर्चाचं आयोजन केलं..मात्र पुण्यातील पाटस टोल नाक्यापासून मुंबईच्या दिशेनं जाणाऱ्या या मोर्चाला पोलिसांनी पुण्यातच अडवलं. यावेळी ओबीसी आंदोलक आणि पोलीस आमने-सामने आल्यानं काहीकाळ तणावाचं वातावरण निर्माण झालं.

पोलिसांनी रोखून धरल्यानंतरही लक्ष्मण हाकेंनी आंदोलनावर ठाम राहत... गोळ्या घातल्या तरी आता माघार घेणार नाही असा आक्रमक पवित्राच हाकेंनी घेतला. पुणे पोलिसांनी मोर्चाला परवानगी नाकारल्यानंतरही ओबीसी आंदोलक आंदोलनावर ठाम राहिले. यामुळे पुणे-सोलापूर महामार्ग ठप्प झाला. तब्बल तासभर चाललेल्या या ठिय्यामुळे वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. त्यानंतर पोलिसांनी तोडगा काढण्याचा प्रयत्न करत आंदोलकांना पाच किलोमीटरपर्यंत मोर्चा काढण्याची परवानगी दिली. त्यानंतर आंदोलकांनी कुच केली खरी. मात्र पाच किलोमीटरनंतर पोलिसांनी आंदोलकांना रोखलं. त्यामुळे आंदोलकांनी थेट रस्त्यावरच बसून ठिय्या मांडला आणि तिथेच जेवणही उरकले.

जरांगेंच्या मागण्यांविरोधात आंदोल नावरून ओबीसी संघटनांमधील मतभेदही चव्हाट्यावर आलाय. एकीकडे ओबीसींच्या हक्कासाठी हाके आंदोलनावर (पान ४ वर)

## महाराष्ट्रातून अमली पदार्थाचे २०२९ पर्यंत समूळ उच्चाटन

### नशामुक्त भारत अभियानासाठी राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय

मुंबई दि.१ (प्रतिनिधी)- नशामुक्त भारत अभियानात महाराष्ट्र राज्याने पुढचे पाऊल टाकले आहे. २०२९ पर्यंत राज्यातून अमली पदार्थांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी तयार करण्यात आलेले सर्वसमावेशक धोरण मंत्रिमंडळ बैठकीत मंजूर करण्यात आले. व्यापक जनजागृती आणि अमली पदार्थांच्या विरोधात कठोर कारवाई असे हे धोरण असेल. यात शासनाच्या सर्वच विभागांचा सहभाग घेतला जाणार आहे. हे सर्वसमावेशक धोरण यशस्वी व्हावे यासाठी ग्राम पातळीपासून ते जिल्हा, विभाग आणि मंत्रालयीन स्तरापर्यंत जबाबदाऱ्यांचे वाटप करण्यात आले आहे. नशामुक्त महाराष्ट्र घडवण्यासाठी विविध विभागांच्या सहकार्याने अशाप्रकारे सर्वसमावेशक अभियान राबवणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य आहे. केंद्र शासनाने विविध केंद्रीय व राज्य शासनाच्या विभागांमध्ये समन्वय साधून २०२९ पर्यंत संपूर्ण देशातून अमली पदार्थांचे समूळ उच्चाटन करण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. त्यानुषंगाने राष्ट्रीय पातळीवर 'नशामुक्त भारत अभियान' प्रभावीपणे राबविले जात आहे.

शासकीय, निमशासकीय बैठका, शासकीय कार्यक्रम व उपहारगृहात आरोग्यदायी अल्पोपहार आणि जेवण उपलब्ध करून देण्याचा आणि तशाच पद्धतीचा मेनू ठेवणे बंधनकारक करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

## तुकाराम मुंढेंच्या निर्णयाला सरकारची स्थगिती, सुटे तेल विक्रीला १ वर्षांची सूट!

मुंबई दि.१ (प्रतिनिधी)- राज्याच्या अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी कारवायाचा धडाका लावला असून काही दिवसांपूर्वी त्यांनी खाद्यतेल विक्रीकडे आपला मोर्चा वळवला होता. खाद्यतेलातील भेसळ आणि गुणवत्तापूर्ण दर्जा कायम ठेवण्यासाठी त्यांनी सुटे खाद्यतेल विक्रीला राज्यात बंदी घातली होती. मात्र, या निर्णयानंतर तेली समाजाने पारंपरिक व्यवसाय असल्याचे सांगत या निर्णयास विरोध केला. तसेच, सुटे तेल विक्री करणारे बहुसंख्य गरीब ग्राहक असल्याचंही त्यांनी म्हटलं होतं. त्याच पार्श्वभूमीवर आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमवेत खाद्य तेल महासंघाच्या पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. त्यामध्ये, तुकाराम मुंढेंच्या खाद्य तेल विक्रीसंदर्भातील निर्णयास स्थगिती देण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खाद्यतेल विक्री संदर्भातील तुकाराम मुंढेंच्या निर्णयाला स्थगिती दिली असून सुटे तेल विक्रीला १ वर्षांची सूट देण्यात आली आहे. मात्र, यासह खाद्यतेल महासंघाच्या पदाधिकाऱ्यांना काही महत्त्वाच्या सूचनाही करण्यात आल्या आहेत. अन्न व औषध प्रशासनाच्या अखत्यारीत सुटे तेल विक्रीसंदर्भात २०११ मध्ये हा कायदा झाला आहे. कारण, सुटे खाद्यतेल विक्रीध्ये गुणवत्ता हा महत्वाचा निकष आहे. मात्र, अनेक गरीब माणसं सुटे तेल घेतात, त्यामुळे कायदा आणि सामान्य माणूस यातून मार्ग काढला पाहिजे. त्याच अनुषंगाने सुटे खाद्यतेल विक्रीसाठी तात्पुरती १ वर्षाची सूट देण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी म्हटले. मात्र, यानंतर मुदतवाढ मिळणार नाही, कायदा पाळावाच लागेल. या एका वर्षात प्रत्येकाने आपल्या व्यवसायात अनुकूल बदल करावा, अशा सूचनाही मुख्यमंत्री फडणवीसांनी खाद्यतेल विक्री करणाऱ्या व्यवसायिकांना दिल्या आहेत.

खाद्यतेल विक्री करण्यासाठी कायद्याचे पालन करताना पारंपरिक व्यावसायिकांना काय बदल करावे लागतील, यासाठी समिती गठित करणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. त्यासाठी, एफडीए आणि व्यापाऱ्यांची संयुक्त समिती नेमणार असून आवश्यकता भासल्यास राज्य सरकार मदत करणार आहे. मात्र, अन्न व औषध प्रशासनाकडून घेण्यात आलेल्या निर्णयाला एक वर्षाची स्थगिती देण्यात आली असून खाद्यतेल विक्री करणाऱ्यांना तात्पुरती १ वर्षाची सूट देण्यात येत असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी म्हटले.

## ठाकरेंचे १४ आमदार शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश करण्याच्या चर्चेला उधान

मुंबई दि.१ (प्रतिनिधी)- महाराष्ट्राच्या राजकारणातली सगळ्यात मोठी माहिती समोर आली आहे. आगामी नवरात्रीच्या आधी शिवसेना ठाकरेंचे १४ आमदार शिंदेंच्या शिवसेनेत पक्ष प्रवेश करणार असल्याचा दावा शिवसेना शिंदे गटातील एका बड्या नेत्याने केला आहे. या १४ आमदारांना शिवसेनेत आणण्याची जबाबदारी तीन मंत्र्यांवर देण्यात आली आहे, अशी माहितीही शिंदेसेनेतील बड्या नेत्याने दिली आहे. सध्या उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेकडे एकूण २० आमदार आहेत. या २० आमदारांपैकी १४ आमदार शिवसेनेत प्रवेश करणार असल्याची माहिती मिळत आहे. त्यामुळे उद्धव ठाकरेंकडे असलेल्या २० आमदारांपैकी कोणते १४ आमदार शिंदे गटात प्रवेश करणार?, याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

कोकण, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रातील मंत्र्यांवर ऑपरेशन टायगरची जबाबदारी देण्यात आल्याची माहिती शिवसेना शिंदे गटातील बड्या नेत्याने दिली आहे. या १४ आमदारांपैकी ६ आमदारांना सरकारमध्ये चांगली (पान ४ वर)

## गरज नसल्यास सोने खरेदी करू नका, परदेशात जाऊन लग्न समारंभ साजरे करू नका; पंतप्रधान मोदींचे आवाहन

नवी दिल्ली दि.१ (वृत्तसंस्था)- भारतीय अर्थव्यवस्थेने चालू आर्थिक वर्षातील एप्रिल ते जून या तिमाहीत ७.८ टक्के इतका विकास दर नोंदवल्याबद्दल पंतप्रधान मोदी यांनी देशवासियांचे आभार मानले आहेत. पंतप्रधान मोदी यांनी मंगळवारी सोशल मीडियावर एक व्हिडीओ शेअर करत देशवासियांशी संवाद साधला. यावेळी पंतप्रधान मोदी यांनी देशवासियांना एक महत्त्वाचे आवाहन केले. देशाचा आर्थिक विकासदर सध्या चांगला आहे. ही गती कायम ठेवायची असेल तर आपल्याला स्वदेशी आणि आत्मनिर्भर भारत या दोन धोरणांचा अधिकाअधिक अवलंब करावा लागेल. त्यासाठी परदेशातील प्रवास टाळा. विदेशात जाऊन लग्नसोहळे करणे टाळा, असा सल्ला पंतप्रधान मोदी यांनी दिला. तसेच गरज नसेल तर सोनं खरेदी करु नका, असे पंतप्रधान मोदी यांनी सांगितले.

भारतीय अर्थव्यवस्थेने ७.८ टक्के इतका आर्थिक विकासाचा दर नोंदवला. यासाठी देशवासियांना खूप खूप शुभेच्छा. संपूर्ण देश आनंदाने भरुन गेला आहे. हे जनतेच्या पुरुषार्थ, संकल्पशक्ती आणि सामूहिक शक्तीचे प्रतीक आहे. संपूर्ण जग युद्धात बुडालं आहे. चारही बाजूंनी संकटांच्या बातम्या येत आहेत. जगभरातील पुरवठा साखळी विस्कळीत झाली आहे. कोरोनानंतर जगभरात कुठेही स्थिरता नाही. तरीही भारत इतक्या वेगाने प्रगती करत आहे. भारतामधील निराशेच्या गर्तेत बुडालेले काही लोक झुठ की गुंजच्या माध्यमातून चारही दिशांना अपप्रचार करत आहेत. मात्र, या सगळ्याला पार करुन, हे निराशेचे वातावरण भेदून भारतीय अर्थव्यवस्थेने ७.८ टक्के इतका आर्थिक विकासदर नोंदवला. ही गती कायम राखायची असेल तर आपल्याला आत्मनिर्भर भारत आणि स्वदेशी या दोन धोरणांचा आग्रहाने अवलंब करावा लागेल, असे मोदींनी म्हटले.

## धनुष्यबाण गोठवण्याची मागणी दुर्दैवी, एकनाथ शिंदेंचा उद्धव ठाकरेंवर निशाणा

नवी दिल्ली दि.१ (वृत्तसंस्था)- शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाणाच्या मुद्द्यावरून सुरू असलेल्या कायदेशीर लढाईच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे गटावर जोरदार निशाणा साधला आहे. 'धनुष्यबाण गोठवण्याची मागणी करणे दुर्दैवी आहे,' अशी टीका शिंदे यांनी केली. तसेच शिवसेना पक्षाची घटना, लोकशाही आणि निवडणूक आयोगाचे अधिकार या सर्व बाबींचा विचार करावा लागेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

शिंदे सध्या दिल्ली दौऱ्यावर असून त्यांनी पत्रकारांशी संवाद साधताना शिवसेनेच्या न्यायालयीन लढाईपासून मराठा आरक्षण, मनोज जरांगे पाटील यांचे आंदोलन, धनुष्यबाणाचे चिन्ह, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावरील विरोधकांची टीका आणि देशाच्या अर्थव्यवस्थेपर्यंत विविध मुद्द्यांवर भूमिका मांडली.

शिवसेना पक्षाच्या संदर्भातील प्रकरणावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. या पार्श्वभूमीवर शिंदे म्हणाले की, संबंधित वकिलांनी (पान ४ वर)

## २ कोटी मतदार वगळले, मुंबईत ३६ लाख; हा मोठा कट!; संजय राऊतांचा केंद्र व राज्य सरकारवर निशाणा

मुंबई दि.१ (प्रतिनिधी)- महाराष्ट्रातील मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेवरून राजकीय वातावरण तापले असतानाच शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते आणि खासदार संजय राऊत यांनी सरकार, निवडणूक आयोग आणि केंद्रातील सत्ताधाऱ्यांवर जोरदार हल्लाबोल केला. महाराष्ट्रातील प्रारूप मतदार यादीत तब्बल दोन कोटी मतदार वगळल्याचा दावा करताना मुंबईतच ३६ लाख मतदार कमी झाल्याचे राऊत यांनी म्हटले. ही बाब अत्यंत गंभीर असून यामागे राजकीय



हेतू असल्याचा आरोप त्यांनी केला. याच पत्रकार परिषदेत राऊत यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आर्थिक दाव्यांवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. जीडीपी वाढीचे आकडे सांगण्यापेक्षा महागाई, बेरोजगारी, रुपयाची घसरण आणि सामान्य नागरिकांच्या जीवनमानावर सरकारने उत्तर द्यावे, अशी टीका त्यांनी केली. याशिवाय डॉक्टरच्या आत्महत्येचे प्रकरण, शिक्षण कार्यालयातील पंतप्रधानांच्या फोटोचा वाद, कुंभमेळा आणि अयोध्येतील राम मंदिराशी संबंधित कथित भ्रष्टाचार, मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्र्यांच्या बंगल्यांवरील खर्च तसेच मराठी भाषा या मुद्द्यांवरही राऊत यांनी भूमिका मांडली.

संजय राऊत यांनी सर्वाधिक आक्रमक भूमिका एसआयआरच्या माध्यमातून मतदार (पान ४ वर)

# तंत्रज्ञानाच्या युगात माणुसकीचे भान

**आजचे** युग विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे आहे. मोबाईल, इंटरनेट, सोशल मीडिया, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), ऑनलाइन शिक्षण, डिजिटल व्यवहार अशा असंख्य तंत्रज्ञानाधारित सुविधा आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनल्या आहेत. काही दशकांपूर्वी अशक्य वाटणाऱ्या अनेक गोष्टी आज काही क्षणांत आपल्या हातातील मोबाईलच्या माध्यमातून शक्य होत आहेत. तंत्रज्ञानाने जीवन अधिक वेगवान, सोपे आणि सुविधाजनक केले आहे. मात्र या प्रगतीसोबत एक मूलभूत प्रश्नही आपल्यासमोर उभा राहतोङ्कतंत्रज्ञानाच्या वेगाने पुढे जाताना आपण माणूस म्हणून मागे तर पडत नाही ना?

आज संवादाची साधने वाढली आहेत; मात्र प्रत्यक्ष संवाद कमी झाला आहे. संपर्कांची संख्या वाढली आहे; पण मनापासून संवाद साधणारी माणसे कमी होत चालली आहेत. जगाच्या कानाकोपऱ्यातील माहिती क्षणात मिळते; पण आपल्या शेजारी राहणाऱ्या व्यक्तीच्या सुख-दुःखाची माहिती आपल्याला नसते. सोशल मीडियावर शेकडो मित्र असतात; परंतु मन मोकळे करून बोलण्यासाठी एखादी व्यक्ती शोधावी लागते. ही विसंगती आधुनिक जीवनाचे वास्तव बनत आहे.

तंत्रज्ञानाला विरोध करणे हा यावर उपाय नाही. उलट तंत्रज्ञानाचा योग्य, विवेकी आणि जबाबदारीने वापर करणे ही काळाची गरज आहे. प्रश्न तंत्रज्ञानाचे अस्तित्व नाही, तर त्याचा वापर कोणत्या पद्धतीने आणि किती प्रमाणात करायचा, हा आहे.

मोबाईल आपल्या हातात असावा; पण आपले मन मोबाईलच्या ताब्यात नसावे. सोशल मीडिया संवादाचे माध्यम असावे; पण आपल्या भावना आणि विचारांवर त्याचे नियंत्रण नसावे. एआयने आपले काम सोपे व्हावे; पण त्याने आपली विचार करण्याची, प्रश्न विचारण्याची आणि स्वतः निर्णय घेण्याची क्षमता हिरावून घेऊ नये. तंत्रज्ञान हे माणसाचे साधन राहिले पाहिजे; माणूस तंत्रज्ञानाचे साधन बनता कामा नये.

आजच्या पिढीसमोर तंत्रज्ञानाच्या संधी जितक्या मोठ्या आहेत, तितकीच आव्हानेही मोठी आहेत. सतत स्क्रीनसमोर राहणे, सोशल मीडियावरील तुलना, तात्काळ प्रसिद्धी आणि यश मिळवण्याची मानसिकता, कमी होत चाललेला संयम, चिडचिड, एकटेपणा आणि अभ्यासातील एकाग्रतेचा अभाव यांचा परिणाम मुलांच्या वर्तनावर होऊ शकतो.

मुलांच्या हातात मोबाईल देणे चुकीचे नाही; पण त्याचा योग्य वापर कसा करायचा हे शिकवणे आवश्यक आहे. इंटरनेटवर काय पाहावे, काय टाळावे, कोणती माहिती खरी आणि कोणती दिशाभूल करणारी आहे, याचे भान मुलांना देणे गरजेचे आहे.

आपण मुलांना स्पर्धेत पुढे जाण्यास सांगतो; पण अपयश स्वीकारण्याची ताकद देतो का? आपण त्यांना मोठी स्वप्ने दाखवतो; पण चांगला माणूस होण्याचे महत्त्व सांगतो का? आपण त्यांच्या गुणांची काळजी घेतो; पण त्यांच्या मनाची अवस्था समजून घेण्याचा प्रयत्न करतो का? हे प्रश्न पालक, शिक्षक आणि समाज या तिन्ही घटकांनी स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे.

डिजिटल तंत्रज्ञान, स्मार्ट क्लासरूम, ऑनलाइन अभ्यासक्रम आणि एआयमुळे शिक्षणाच्या संधी मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. हे स्वागतार्ह आहे. मात्र शिक्षणाचा अंतिम उद्देश केवळ चांगले गुण मिळवणे, उच्च शिक्षण घेणे किंवा मोठी नोकरी मिळवणे एवढाच नसावा. शिक्षणाने माणूस विचारशील, विवेकी, संवेदनशील आणि जबाबदार नागरिक बनला पाहिजे.

एखादा विद्यार्थी गणितात हुशार असेल, विज्ञानात प्रावीण्य मिळवेल आणि संगणकाचे उत्तम ज्ञान त्याला असेल; पण त्याला दुसऱ्याच्या दुःखाची जाणीव नसेल, सहकार्याची भावना नसेल, अपयश स्वीकारता येत नसेल किंवा ज्येष्ठांचा आदर करता येत नसेल, तर त्याच्या शिक्षणात काहीतरी महत्त्वाचे अपूर्ण राहिले आहे. म्हणूनच आधुनिक शिक्षणात मूल्यशिक्षणाची गरज पूर्वीपेक्षा अधिक आहे. पूर्वी शिक्षक हा विद्यार्थ्यांसाठी माहितीचा प्रमुख स्रोत होता. आज मात्र एका क्लिकवर हजारो माहितीचे स्रोत उपलब्ध आहेत. त्यामुळे शिक्षकाची भूमिका आता केवळ माहिती देणाऱ्याची राहिलेली नाही.

आज शिक्षकाने मार्गदर्शक, विचारप्रवर्तक आणि मूल्यसंस्कार करणारा व्यक्ती बनणे आवश्यक आहे. विद्यार्थ्याने प्रश्न विचारला तर केवळ उत्तर देण्याऐवजी त्या प्रश्नामागे विचार करण्यास त्याला प्रवृत्त केले पाहिजे. 'हे बरोबर आहे का?' एवढ्यावर न थांबता 'तुला असे का वाटते?', 'याचा दुसरा दृष्टिकोन कोणता असू शकतो?', 'याचा समाजावर काय परिणाम होईल?' असे प्रश्न विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण करणारे शिक्षण भविष्यातील पिढी अधिक सक्षम करेल.

आजच्या स्पर्धात्मक वातावरणात पालकांच्या अपेक्षा असणे स्वाभाविक आहे. मात्र प्रत्येक मुलाची क्षमता, आवड, शिकण्याची गती आणि स्वभाव वेगळा असतो. सतत दुसऱ्या मुलाशी तुलना केल्याने प्रेरणा निर्माण होण्याऐवजी न्यूनगंड निर्माण होऊ शकतो.

'पाहा, अमुक मुलाला एवढे गुण मिळाले', अशी तुलना करण्याऐवजी 'तू तुझ्या क्षमतेनुसार किती प्रयत्न केलेस?' हे विचारणे अधिक महत्त्वाचे आहे. मुलाला सर्वप्रथम हे जाणवले पाहिजे की, 'मी चुकलो तरी माझे आई-वडील माझ्यासोबत आहेत.' घरामध्ये संवादाची जागा निर्माण झाली पाहिजे. दिवसातून काही वेळ मोबाईल बाजूला ठेवून मुलांशी बोलणे, त्यांच्या मनातील प्रश्न ऐकणे, त्यांच्या छोट्या यशाचे कौतुक करणे आणि अपयशाच्या वेळी त्यांना धीर देणेङ्कहेही तितकेच महत्त्वाचे पालकत्व आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता हे आधुनिक काळातील अत्यंत प्रभावी तंत्रज्ञान आहे. शिक्षण, उद्योग, आरोग्य, प्रशासन आणि अनेक क्षेत्रांमध्ये त्याचा वापर वाढत आहे. एआयमुळे माहिती मिळवणे आणि अनेक कामे करणे सोपे झाले आहे. परंतु एआयने दिलेले प्रत्येक उत्तर अंतिम सत्य असेलच असे नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांनी एआयकडून माहिती घ्यावी; पण तिची सत्यता तपासावी, विविध स्रोतांचा संदर्भ घ्यावा आणि स्वतःचे मत तयार करावे.

हा संदेश आजच्या पिढीपर्यंत पोहोचणे अत्यंत आवश्यक आहे. तंत्रज्ञानाचा वापर करताना विवेक, चिकित्सक विचार आणि जबाबदारी या तीन गोष्टींची साथ असली पाहिजे. आजच्या वेगवान जगात यश, पैसा, प्रसिद्धी आणि पद यांना मोठे महत्त्व दिले जाते. मात्र माणसाच्या खऱ्या मोठेपणाचे मोजमाप त्याच्याकडे किती आहे यावर नव्हे, तर तो इतरांसाठी काय करतो यावर झाले पाहिजे.

एखाद्याला अडचणीत पाहून मदतीचा हात पुढे करणे, दुःखी व्यक्तीचे दोन शब्द ऐकून घेणे, चूक झाल्यावर माफी मागणे, दुसऱ्याच्या यशाचा मनापासून आनंद घेणे आणि अपयशी व्यक्तीला प्रोत्साहन देणे या छोट्या गोष्टी समाज अधिक सुंदर बनवतात. आपण मुलांना उत्तम शिक्षण देऊ, आधुनिक तंत्रज्ञान देऊ, चांगल्या संधी उपलब्ध करून देऊ आणि त्यांच्या करिअरसाठी प्रयत्न करू. पण त्यासोबत प्रामाणिकपणा, कष्ट, संयम, सहकार्य, कृतज्ञता, सामाजिक बांधिलकी, पर्यावरणाची जाणीव आणि माणुसकी दिली तरच त्यांचे जीवन खऱ्या अर्थाने समृद्ध होईल.

# संसदेचे कामकाज, जनतेचा अपेक्षाभंग

**संसदेचे** पावसाळी अधिवेशन गोंधळ, गदारोळ आणि सरकारविरोधी घोषणांमधे वाहून गेले. विरोधी पक्षांनी वारंवार मागणी करून, घोषणा देऊनही पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे सभागृहाकडे फिरकले नाहीत. अमित शहा माफी मांगो आणि राहुल गांधी भागो मत अशा घोषणा युध्दात पावसाळी अधिवेशनाचे सूप वाजले. संसदेच्या अधिवेशनातून देशातील जनतेला काय मिळाले तर वंदमातरम या राष्ट्रगीताचा अवमान झाला तर तुरूंगवासाची शिक्षा करणारा कायदा संमत झाला. केरळचे नामांतर केरळम झाले. सरकारने मांडलेली बारा विधेयके गोंधळ- गदारोळात चर्चा न होता मंजुर झाली. संसदेच्या अधिवेशनात जनतेच्या प्रश्नांवर, विधेयकांवर चर्चा होणार नसेल आणि विरोधी पक्षांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तरे देण्यासाठी पंतप्रधान किंवा गृहमंत्री सभागृहात येणारच नसतील तर अधिवेशनाचा उपयोग काय ? आम्हाला थेट प्रश्न विचारणारे तुम्ही कोण ? अशी मानसिकता सरकारकडे असेल तर विरोधी पक्षांनी कितीही आदळ- आपट केली तरी ती व्यर्थ ठरणार आहे.

संसदीय लोकशाही पध्दती असणारा भारत हा जगातील सर्वात मोठा देश आहे. सन २०१४ मधे नरेंद्र म ोदी प्रथम पंतप्रधान म्हणून संसद भवनात आले तेव्हा त्यांनी लोकशाहीच्या सर्वोच्च मंदिराच्या पायऱ्यांवर नतमस्तक होऊन वंदन केले होते. आपण देशाचे प्रधान सेवक असल्याचे जहीरपणे सांगितले होते. सत्ता स्थापनेसाठी जनतेने भाजपाला निवडून दिले आहे तसेच विरोधी बाकांवर बसून जनतेचा आवाज उठविण्यासाठी काँग्रेस, सपा, तृणमूल काँग्रेस, उबाठा सेना, राष्ट्रवादी काँग्रेस (शप), नॅशनल कॉन्फरन्स, राजद, द्रमुक आदी पक्षांना भाजपाच्या विरोधात निवडून दिले आहे. अहंकार व दुस्वास यामुळे सरकार व विरोधी पक्ष यांच्यात समन्वय राहिलेला नाही. पावसाळी अधिवेशनानंतर सरकार व विरोधी पक्ष यांच्यात कटुता वाढली आहे. दोन्ही बाजुंचे आयटी सेल ही कटुता आणखी कशी वाढेल व जनतेत एकमेकांची बदनामी कशी होईल यासाठी अहोरात्र सक्रिय असतात. यातून जनतेला काय फायदा ? संसदीय कामकाजात सत्ताधारी व विरोधकांनी एकमेकांचा आदर राखणे महत्वाचे असते. संसदीय कामकाजात प्रत्येक मिनिट मोलाचा आहे याचे भान दोन्ही बाजुने राखले पाहिजे. प्रत्यक्षात तसे घडत नाही. संसदेचे कामकाज चालविण्याची जबाबदारी ही सरकारची आहे असे भाजपाने विरोधी पक्षात असताना अनेकदा घोकले आहे. बोफोर्स, कोळसा घोटाळा किंवा स्पेक्ट्रम टू जी घोटाळ्यावरून संपूर्ण अधिवेशन ठप्प करण्याची किमया भाजपाने विरोधी पक्षांत असताना करून दाखवली आहे. युध्दात शहीद झालेल्या जवानांसाठी मागविण्यात आलेल्या कॉफिनमधे घोटाळा झाल्याचा आरोप करून अनेक दिवस संसदेचे कामकाज ठप्प केल्याचा पराक्रमही भाजपाने करून दाखवला होता. आता भाजपा सत्तेवर आहे. जंतरमंतर वर झालेल्या जेन झी आंदोलनातील विद्यार्थ्यांवर गोळीबाराचे आदेश पोलिसांना कुणी दिले असा थेट व धारदार सवाल काँग्रेसने विचारला आहे. लोकसभेत राहुल गांधी, प्रियंका गांधी वड्रा, सपाचे अखिलेश यादव तसेच दुसरीकडे राज्यसभेत मल्लिकार्जून खरगे यांनी हाच प्रश्न विचारून सरकारला घाम फोडला आहे. विद्यार्थ्यांवर गोळीबार करण्याचा आदेश आपण गृहमंत्री म्हणून दिला असे सांगितले तरी अमित शहा अडचणीत येतात आणि असा आदेश आम्ही दिलेला नाही असे म्हटले तर त्यांचे नियंत्रण दिल्ली पोलिसांवर नाही का ? म्हणून पुन्हा तेच कोंडीत सापडतात. दिल्ली पोलीस हे केंद्र सरकारच्या अखत्यारीत येतात. केंद्रीय गृहमंत्र्यांच्या आदेशाशिवाय दिल्ली पोलिसांत पानही हालत नाही. त्यामुळेच अमित शहा संसदेच्या दोन्ही दोन्ही सभागहात वीस जुलैनंतर फिरकले नसावेत. मोदी- शहा सभागृहात आल्याशिवाय आम्ही कामकाज चालू देणार नाही हा हेका विरोधी पक्षाने शेवटपर्यंत कायम ठेवला. सरकारमधील दोन्ही सर्वोच्च नेते संसद भवनात त्यांच्या कार्यालयात रोज येत होते पण वीस जुलैच्या लाठीमार, अश्रुधूर व ( पॅलेटगन्स ) गोळीबाराच्या घटनेपासून सभागृहात फिरकलेच नाहीत. तेरा ऑगस्टला सभागृहात आले ते वंदेमातरम गीत ऐकण्यासाठी आले असावेत. आपण सदनात येऊन चर्चेला उत्तर देणार असे स्वत: अमित शहा यांनी पत्रकारांना सांगितले होते. ते आले, वंदेमातरम झाले व सभागृहाचे कामकाज अनिश्चित कालापर्यंत स्थगित झाल्याचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी जाहीर केले. हे सर्व अचानक व अनपेक्षित घडले. विद्यार्थ्यांवर गोळीबार, निर्घृण लाठीमार व अश्रुधूराच्या नळकांड्या फोडण्याचे आदेश कुणाचे ? याचे उत्तर या अधिवेशनात मिळू शकले नाही.

देशाच्या ८० व्या स्वातंत्र्य दिनाच्या पूर्व संध्येला संसदेचे पावसाळी अधिवेशन जनतेच्या पदरी निराशा टाकून देऊन संपवले गेले. अधिवेशनात आरोप प्रत्यारोप होतात, एकमेकांवर कुरघोडी केली जाते, परस्परांना खिजविणाऱ्या घोषणा होतात, सत्ताधारी व विरोधी पक्ष एकमेकांचे अवमान करतात हे जरी मान्य केले तरी कामकाजच होत नाही हे अतिशय गंभीर आहे. लोकसभा व राज्यसभेत प्रश्नोत्तराच्या तासाला रोज चारशे तरी प्रश्न लेखी पुस्तिकेत असतात. प्रश्नोत्तराचा तास ही सरकारची कसोटी असते. सरकारला धारेवर धरण्याचे हे प्रमुख हत्यार असते. पण या तासाला अधिवेशनात चर्चाच झाली नाही, हे मोठे दुर्दैव आहे. संसदेच्या पावसाळी अधिवेशनात लोकसभेत जेमतेम १७ टक्के तर राज्यसभेत ३७ टक्के कामकाज झाले. हे मुळीच भूषणावह नाही. संसद भवन ही काही दगड विटांची इमारत नाही. सर्व देशातील भावभावनांचे प्रतिबिंब लोकशाहीच्या सर्वोच्च सदनात पडले पाहिजे. रोज संसद ठप्प होत असूनही पंतप्रधान व गृहमंत्री फिरकले नाहीत, यातून सरकार काय संदेश देऊ इच्छिते ? संसदीय कामकाज मंत्री विरोधी पक्षाला आवाहन करण्यापलिकडे काय करू शकतात? त्यांना स्वातंत्र्य व अधिकार किती आहेत ? सरकारच्यावतीने ते काही ठोस आश्वासन तरी देऊ शकतात का ? पंतप्रधान किंवा गृहमंत्री यांना सभागृहात या असे म्हणू शकतात का ? लोकसभा अधयक्ष किंवा राज्यसभेचे सभापतीही पंतप्रधान किंवा गृहमंत्र्यांना संसदेच्या सदनात हजर राहण्यासंबंधी निर्देश देऊ शकत नाहीत. दोन्ही सर्वोच्च नेते सदनात येत नाहीत व विरोधी पक्ष कामकाज चालू देत नाहीत, यातूनच मोठा पेच निर्माण झाला आहे.

संसद किंवा विधिमंडळाचे सभागृह हे संवादाचे सर्वोच्च व्यासपीठ आहे. पण सरकार व विरोधी पक्षात संवादच नसेल तर कामकाज होणार कसे ? जनतेच्या संवेदनशील मुद्यावर उत्तरदायित्व कोणाचे हेच जर निश्चित नसेल तर विद्यार्थ्यांवर गोळीबाराचे आदेश कुणी दिले हे कसे समजणार ? संसदेच्या पावसाळी अधिवेशनात काँग्रेस आक्रम क होती तर सरकार बचावात्मक दिसले.

नीट पेपर फुटीची खापर धर्मेंद्र प्रधानांवर फोडले गेले त्यांनी विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून राजीनामा दिला. विरोधीपक्षाचे पुढचे टार्गेट अमित शहा होते, ते साध्य झाले नाही. पण ते वीस जुलै ते बारा ऑगस्ट या काळात सदनाकडे फिरकलेच नाहीत ही काही चाणक्यानिती नव्हे.

भाजपाचे संस्थापक, उत्तुंग नेते, दिवंगत पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी म्हणत- जो देश की सरकार को सवाल पूछ नहीं सकता, वो देश प्रेमी नही, सत्ताप्रेमी होता हैः

**– डॉ. सुकृत खांडेकर**

# बँकिंगमधील विलक्षण अनुभव

२ सप्टेंबर २००६ हा दिवस तत्कालीन युनायटेड वेस्टर्न बँकेतील सर्व कर्मचारी अधिकारी वर्गाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आणि आयुष्यभर आठवण राहील असा होता. 'आपुलकीने वागणारी माणस' असा लोगो असलेली, महाराष्ट्रातील दृष्ट्या मंडळींनी सुरू केलेली, सातारा येथे मुख्यालय असलेली बँक, या बँकेवर रिझर्व बँक ऑफ इंडियाने अचानक निर्बंध जाहीर केले.

साधारण दहा हजार कोटीचा व्यवसाय असलेली, अडीचशे पेक्षा अधिक शाखा, संपूर्ण देशभरात नेटवर्क, आणि त्या काळात नव्याने सुरू झालेले कोअर बँकिंग असलेली खाजगी क्षेत्रातील नावाजलेली बँक असा बँकेचा लौकिक होता.

रिझर्व बँक ऑफ इंडिया च्या काही तांत्रिक अटींचा भंग झाल्यामुळे या बँकेवर निर्बंध आणण्यात आले होते.

शनिवारी दुपारी दोन वाजता अचानक बँकेचे सर्वर डाऊन झाले. अडीच वाजल्यापासून टीव्हीवर युनायटेड वेस्टर्न बँकेवर निर्बंध आल्याची बातमी,मुख्य बातमी म्हणून प्रसारित होणे सुरू झाले. बँकेच्या कर्मचारी आणि खातेदारांसाठी हा एक मोठा धक्का होता. बातमीमध्येच पुढे असे जाहीर करण्यात आले होते की, प्रत्येक खातेदाराला फक्त रुपये दहा हजार एकदाच काढता येतील. मी त्यावेळी परभणी येथे शाखाधिकारी म्हणून काम करत होतो. बँकिंगचा अभ्यासक असल्यामुळे निर्बंध म्हणजे काय याची पूर्ण कल्पना होती. सर्वप्रथम कर्मचारी वर्गाची तातडीने बैठक घेऊन कळलेली बातमी सविस्तरपणे त्यांना समजावून सांगितली. सोमवारी बँक सुरू झाल्यावर काय घडू शकेल याची ढोबळमानाने कल्पनाही दिली. संध्याकाळी सातच्या सुमारास शहरातील प्रमुख खातेदारांना बँकेत बोलावून कळलेली बातमी सांगितली. आहे त्या परिस्थितीत सहकार्य करावे असे आवाहन केले. सर्व खातेदारांनी आम्ही तुमच्या सोबत आहोत असे आश्वासन दिले. खातेदारांशी असलेल्या आपुलकीचे संबंध, बँकेशी असलेला त्यांचा ऋणानुबंध, याची त्या संकटकाळात सर्वात जास्त जाणीव झाली.

शनिवारी दुपारी पोलीस प्रमुखांकडे माहिती देण्यासाठी गेल्यावर त्यांनी गणेशोत्सव असल्यामुळे कोणत्याही प्रकारचा बंदोबस्त देता येणार नाही असे सांगून आमची चिंता वाढवली!

रविवारी सर्व मराठी वृत्तपत्रात बँकेवरील निर्बंधाची बातमी प्रमुख मथळा म्हणून प्रसिद्ध करण्यात आली होती. बातमी सोबतच आघाडीच्या प्रमुख बँकांनी बँक ताब्यात घेण्याची तयारी दाखवल्याची बातमी देखील आली होती. ही बातमी दिलासा देणारी होती.

सोमवारची काळजी असल्यामुळे, सर्व वर्तम ानपत्रांचा गठ्ठा घेऊन रविवारी सकाळी निवासी जिल्हाधिकारी यांच्या घरी गेलो. शासकीय कर्ज योजनांच्या सहभागामुळे सर्व शासकीय यंत्रणांशी चांगले संबंध होते. त्यांना



कायदा आणि सुव्यवस्था याबद्दल माहिती दिल्यानंतर त्यांनी तातडीने पोलीस बंदोबस्त देण्याचे ताबडतोब मान्य केले. माननीय जिल्हाधिकारी यांनी रविवारी त्यांचे कार्यालय उघडून पोलीस प्रमुखांसाठी पत्र तयार करून दिले. रविवारी दुपारी चार वाजता हे पत्र पोलीस प्रमुखांना दिल्यावर त्यांनी पुरेसा बंदोबस्त देण्याचे आश्वासन दिले. रविवारी दुपारी स्टेट बँकेच्या शाखाधिकारी यांच्या घरी जाऊन परिस्थितीची कल्पना दिली. बँकर्स क्लबच्या कामामुळे त्यांचा चांगला परिचय होता आणि त्यांच्याशी चांगले संबंध होते. त्यांनी सकाळी साडेनऊ वाजता विशेष बाब म्हणून तिजोरी उघडून दोन कोटी रुपयांच्या शंभराच्या कोऱ्या नोटा दिल्या. बँकर्सशी चांगले संबंध असल्यामुळे हे सर्व होऊ शकले असे आता वाटते.

रविवारी संध्याकाळीच एसीपी यांनी बंदोबस्ताची माहिती देऊन बँक शक्यतो लवकर सुरू करण्याच्या सूचना दिल्या. अकरा वाजता सुरू होणारी बँक आम्ही त्या दिवशी साडेनऊ वाजता सुरू केली. बंदोबस्तासाठी एसीपी स्वतः, पाच महिला पोलीस, २५ कॉन्स्टेबल्स, आणि २५ होमगार्ड असा तगडा बंदोबस्त आम्हाला देण्यात आला होता. (नंतर त्याचे बिल भरावे लागले !)

सकाळी साडेनऊ वाजता तत्कालीन नगराध्यक्ष श्री प्रतापराव देशमुख, (हे बँकेचे सन्माननीय खातेदार होते ) बँकेसमोर आपल्या ताफ्यासह हजर होते. बँकेसमोर पैसे काढण्यासाठी साधारण अडीचशे ते तीनशे लोक जमा झाले होते.

प्रतापराव देशमुख यांनी जमलेल्या खातेदारांसम ोर भाषण करून बँकेच्या भवितव्याबद्दल काळजी करण्याचे कारण नाही असे आश्वासन दिले. कोणाचेही पैसे बुडणार नाहीत हे त्यांनी स्पष्ट केल्यामुळे साधारण शंभर,सव्वाशे लोक त्यांच्या भाषणानंतर आम्हाला भेटून परत गेले.

पहिल्या दिवशी साधारण सव्वाशे लोकांनी पैसे काढले. फक्त पैसे देण्याचे काम असल्यामुळे सर्व काउंटर्स वर ते काम सुरू ठेवल्याने अडीच वाजता बँकेसमोरची गर्दी संपली.

दहा हजार रुपये मिळत आहेत या बातमीम ुळे खातेदारांना दिलासा मिळाला. दुसऱ्या दिवशीपासून युनायटेड वेस्टर्न बँक घेण्याची तयारी देशातील बारा प्रमुख बँकांनी,काही वित्त संस्थांनी दाखवल्याच्या बातम्या वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्यामुळे पैसे काढणाऱ्यांची गर्दी हळूहळू ओसरली. तिसऱ्या दिवशीपासून नाममात्र पोलीस बंदोबस्त होता. बँकेवरील आलेल्या संकटाच्या काळात, बहुतांशी खातेदारांनी सहकार्य केले, भांडण किंवा वितंड वादाचे प्रसंग आलेच नाहीत, ही ग्राहक सेवेची पूर्व पुण्याई होती असे आता जाणवते. या काळात पैसे काढणारे श्रीमंत, किंवा आर्थिक क्षेत्रात ज्यांना हाय नेटवर्थ इंडिव्हिज्युअल असे म्हणतात अशांनीच पैसे काढले. बचत गट, पगारदार, शेतकरी इत्यादी या वर्गाने फक्त चौकशी केली, पण पैसे मात्र काढले नव्हते.

परभणी येथील शिवाजी महाविद्यालयातील निवृत्त अर्थशास्त्राचे प्राध्यापक हे पहिल्या दिवशीपासून पूर्ण एक महिना रोज बँकेत येत होते. कर्मचारी वर्गाला दिलासा देत होते. ओळखीच्या खातेदारांना पैसे काढू नका असा सल्लाही देत होते. सीनियर प्राध्यापक असल्यामुळे त्यांच्या शब्दांना बऱ्यापैकी मान होता. पहिले काही दिवस चहा पाण्याचा खर्च नगराध्यक्ष यांनी केला. नंतर स्टाफने कॉन्ट्रीब्युशन केले. पोलिसांचे चार्जेस व्यक्तिगत खात्यातून द्यावे लागले, पुढे ते परत मिळाले. एका रागीट खातेदाराने हायकोर्टामध्ये त्यांचे पैसे क्लिअरिंग मध्ये अडकल्याची याचिका दाखल केली होती. याचिकेचा नंबर येईपर्यंत आयडीबीआय बँकेने बँक टेकओवर केली होती. याचिकेच्या उत्तरात त्यांनी क्लिअरिंग सुरू केल्याचे नमूद केले, प्रत्यक्ष दावा सुनावणीच्या आधी त्यांना पैसे मिळाल्यामुळे त्यांनीच याचिका परत घेतली!


एक महिना कर्मचारी,अधिकारी वर्गाने जिभेवर साखर आणि डोक्यावर बर्फ ठेवून काम केले. नोकरी जाते की राहते ही चिंता होती, पण आयडीबीआय ने बँक ताब्यात घेण्याचा निर्णय घेतल्यानंतर सारे सुरळीत झाले. दोन ऑक्टोबरला बँकेचा बोर्ड बदलला तेव्हा सर्वजण अत्यंत भावुक झाले होते. शिपाई आणि कॅशियर ढसाढसा रडले होते. वरिष्ठांना ते स्वातंत्र्य नव्हते. वीस वर्षात पुलाखालून बरेच पाणी गेले आहे. आयडीबीआय मधील विलीनीकरणातील चांगल्या बाबी म्हणजे, कोणाचीही नोकरी गेली नाही. तीन वर्षानंतर इंडस्ट्री लेवल प्रमाणे पगार मिळाला.

योग्य कर्मचारी, अधिकारी वर्ग यांना योग्यतेप्रमाणे प्रमोशन मिळाले. मागासवर्गीय कर्मचारी वर्गाला शासकीय धोरणाप्रमाणे प्रमोशन्स मिळाले. युनायटेड वेस्टर्न बँकेच्या बहुतांशी शाखांमध्ये जुनेच शाखाधिकारी आणि कर्मचारी वर्ग कायम राहिला. मागे वळून पाहताना जुन्या बँकेच्या अनेक आठवणी मनात गर्दी करतात. निर्बंध आणि विलीनीकरण हा बँकरच्या आयुष्यातील एक कधीही न विसरता येणारा अनुभव आहे. या अनुभवाकडे सकारात्मकपणे बघणे एवढेच हातात आहे.

**– डॉ. अभय मंडलिक**

# मराठवाड्याचे क्रांतिसिंह स्व. विनायकराव अण्णा पाटील

मराठवाड्याच्या मातीत अनेक थोर संत, महात्मे, साहित्यिक, विचारवंत, कवी, राजकारणी जन्माला आले. यातील एका थोर विभूतीचा मराठवाड्याच्या मातीस परिसस्पर्श झाला आणि येथे शैक्षणिक क्रांती घडून आली. खेड्यापाड्यातील गोरगरिबांच्या घराघरांत ज्ञानाचा दीप उजळला. या शैक्षणिक क्रांतीचे प्रणेते आणि मराठवाड्याचे क्रांतिसिंह स्व. विनायकराव अण्णा पाटील यांचा आज स्मृतिदिन. स्व. विनायकराव अण्णा पाटील यांचा जन्म छत्रपातीं संभाजीनगर येथील वैजापूर तालुक्यातील लोणी या खेड्यात १ सप्टेंबर १९२६ रोजी झाला. त्यांचे वडील स्व. पांडुरंगराव जाधव पाटील हे हाडाचे प्राथमिक शिक्षक होते. घरची आर्थिक स्थिती अत्यंत नाजूक आणि हालाखीची होती. स्व. विनायकराव अण्णा पंचक्रोशीत लहानपणापासून रोखठोक व स्वाभिमानी बाण्याचे होते. ज्ञान संपादनासाठी त्यांनी आपल्या जिवाचे रान केले. परिस्थितीवर



मात करून त्यांनी एलएलबीची पदवी मिळवून ते बॅरिस्टर झाले. मात्र वकिली व्यवसायापेक्षा समाजसेवेचे व्रत घेऊन त्यांनी शिक्षकी पेशा स्वीकारला. त्यातून त्यांनी खूप कटू अनुभव घेतले, माणसे जोडली. अनेक कटू अनुभव पचवले, परंतु कडवट भावना मनात रुजू दिली नाही. त्यांच्या विचारांवर महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांचा मोठा पगडा होता. ते स्व. यशवंतरावांच्या पुरोगामी नेतृत्वाकडे आकर्षिले गेले. महाराष्ट्रात तरुण कार्यकर्त्यांची फळी तयार करण्यासाठी महाराष्ट्रभर त्यांनी रात्रंदिवस दौरे केले.

**निकला था जानिबे मंजिल अकेला।**
**लोग जुडते गये कारवाँ बनता गया।**

याप्रमाणे स्व. विनायकराव अण्णा यांच्या रूपाने मराठवाड्याची अस्मि ता घेऊन उमदे नेतृत्व महाराष्ट्राच्या राजकीय क्षितिजावर उदयाला आले. म राठवाड्यासारख्या मागासलेल्या भागाचा कायापालट करावयाचा असेल तर शिक्षणासारखे प्रभावी दुसरे साधन नाही, हे त्यांनी ओळखले. १४ सप्टेंबर १९५८ रोजी स्व. यशवंतरावांच्या चव्हाण प्रेरणेने त्यांनी आपले सहकारी स्व. दादासाहेब सावंत व इतर सच्च्या निष्ठावान सहका- यांना सोबत घेऊन ग्रामीण भागातील गोरगरिबांची, शेतक-यांची, शेतम जुरांची मुले शिकावीत, त्यांना नोकरी आणि रोजी-रोटी मिळावी, त्यांना सन्मानाने समाजात जगता यावे. यासाठी मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ या शिक्षण संस्थेची स्थापना केली. आज या शिक्षण संस्थांचे जाळे मराठवाड्यात सर्वदूर पसरलेले आहे.

१९६२ मध्ये इंदिरा काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वाची धुरा त्यांच्या खांद्यावर आली. स्व. विनायकरावांसारख्या तरुण कार्यकर्त्यावर महाराष्ट्र काँग्रेसची जबाबदारी महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतरावजींनी टाकल्यामुळे अनेक नेत्यांनी त्याकाळी चिंता व्यक्त केली होती. परंतु पुरोगामी विचारसरणीच्या आणि तत्त्वनिष्ठ स्व. विनायकरावांनी काँग्रेस कार्यकर्ते व युवकांना नवी दिशा दिली. १९६७ मध्ये वैजापूर मतदारसंघातून त्यांनी निवडणूक लढविली व प्रचंड मताधिक्याने विजय मिळवून महाराष्ट्र विधानसभेत प्रवेश केला. पंतप्रधान स्व. इंदिरा गांधी यांनी त्यांच्यावर महाराष्ट्र राज्याचे सहकारमंत्री म्हणून जबाबदारी सोपवण्यात आली. शिक्षण क्षेत्रावरील प्रेम व निष्ठा, तसेच सहकारी जीवनपद्धतीवर त्यांचा ठाम विश्वास होता. वैजापूरसारख्या दुष्काळी भागातील शेतक-यांचा विकास व्हावा म्हणून त्यांनी अनेक सिंचन प्रकल्पांना मंजुरी मिळवून दिली. नांदूर-मधमेश्वर, मन्याड, शिवना टाकळी तसेच पालखेड डाव्या कालव्याचे पाणी शेतक-यांना मिळावे म्हणून त्यांनी मोलाचे प्रयत्न केले. ध्येयवादाने प्रेरित होऊन त्यांनी सहकार क्षेत्रात साखर कारखाने, सूतगिरण्या, दूध उत्पादक संस्था, सहकारी बँकांना बळकटी देऊन समाजोन्नती साठी दूरदृष्टी दाखविली. कोणतेही पद सेवेसाठी असते. याची प्रचिती सर्वांना आणून दिली. २८ डिसेंबर १९६८ ला वयाच्या अवघ्या बेचाळिसाव्या वर्षी स्व. विनायकरावांनी या जगाचा निरोप घेतला. त्यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्याचा आदर्श आजच्या काळात निश्चितच दिशादर्शक आहे. अशा थोर क्रांतिसिंहास कोटी-कोटी प्रणाम!

**– संजय अंबादास पाटील**

# मिटमिटा येथे श्री स्वामी मच्छिंद्रनाथ व श्री सप्तशृंगी माता मंदिरात शिवलीलामृत सामूहिक पारायण व रुद्राभिषेक उत्साहात





छत्रपती संभाजीनगर, दि. १ (प्रतिनिधी) – मिटमिटा येथील श्री स्वामी मच्छिंद्रनाथ व श्री सप्तशृंगी माता मंदिरात पवित्र श्रावण मासानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. दिनांक २४ ऑगस्ट ते ३० ऑगस्टदरम्यान मंदिरात श्री शिवलीलामृत सामूहिक पारायण सप्ताह भक्तिमय वातावरणात संपन्न झाला.

या सप्ताहात दररोज सकाळी ‘ॐ नमः शिवाय’ या पवित्र मंत्राचा १०८ वेळा सामूहिक जप करण्यात येत होता. त्यानंतर श्री शिवलीलामृत ग्रंथाचे सामूहिक पारायण केले जात असे. पारायणाच्या काळात भक्तिमय वातावरण निर्माण होत असून, परिसरात मंत्रोच्चार आणि धार्मिक स्तोत्रांच्या स्वरांनी आध्यात्मिक वातावरण भारून गेले होते.

यावेळी सहभागी भाविकांकडून दररोज महामृत्युंजय मंत्राचे सामूहिक उच्चारण करण्यात आले. तसेच भगवान शिवाला बेलपत्र अर्पण करून विधिवत बिल्वार्चन करण्यात आले. श्रावण म हिन्याच्या धार्मिक परंपरेनुसार भाविकांनी मोठ्या श्रद्धेने या उपक्रमात सहभाग नोंदविला.

दरम्यान, श्रावण सोमवार, दिनांक ३१ ऑगस्ट २०२६ रोजी मंदिरात सामूहिक रुद्राभिषेक आयोजित करण्यात आला. मंत्रोच्चार, अभिषेक आणि पूजाविधीमुळे मंदिर परिसरात अत्यंत भक्तिमय व भावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. मोठ्या संख्येने भाविकांनी रुद्राभिषेकात सहभागी होऊन भगवान शिवाचे दर्शन घेतले.

या धार्मिक कार्यक्रमात महिला भक्तांमध्ये विशेष उत्साह दिसून आला. पारायण सप्ताहापासून रुद्राभिषेकापर्यंत महिला भाविकांनी मोठ्या श्रद्धेने सहभाग घेतला. श्रावण मासातील या धार्मिक उपक्रमामुळे मिटमिटा परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून, मंदिर परिसरात भाविकांची मोठी उपस्थिती पाहायला मिळाली.

# पत्रकारितेत तंत्रज्ञानाची कास धरा - गगन महोत्रा







नांदेड, दि. १ (प्रतिनिधी) पत्रकारितेचे भविष्य अधिक सक्षम, आधुनिक आणि विकसित करायचे असेल तर पत्रकारांनी बदलत्या तंत्रज्ञानाचा स्वीकार करणे अत्यावश्यक आहे. पत्रकारितेला चांगले दिवस आणण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करावा लागेल, असे प्रतिपादन व्हॉईस ऑफ मीडिया व्ही ओ एम इंटरनॅशनल फोरमचे आंतरराष्ट्रीय चीफ गगन महोत्रा यांनी केले.

व्हॉईस ऑफ मीडिया व्ही ओ एम इंटरनॅशनल फोरमच्या वतीने नांदेड येथे आयोजित करण्यात आलेल्या मराठवाडा स्तरीय कॅडर कॅम्पला साडेचारशेहून अधिक पदाधिकारी उपस्थित असून, पत्रकारिता, संघटनात्मक बांधणी, आधुनिक तंत्रज्ञान, पत्रकारितेची मूल्ये आणि पत्रकारांच्या भविष्यासंदर्भात विविध महत्त्वपूर्ण विषयांवर या कॅम्पमध्ये मार्गदर्शन करण्यात येत आहे.

कॅम्पमध्ये मार्गदर्शन करताना गगन महोत्रा यांनी पत्रकारितेतील बदलत्या तंत्रज्ञानाचे महत्त्व अधोरेखित केले. आजच्या वेगवान युगात पत्रकारांनी केवळ पारंपरिक माध्यमांवर अवलंबून न राहता डिजिटल माध्यमे, आधुनिक तंत्रज्ञान आणि नव्या संवादप्रणालींचा स्वीकार करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. ङ्गपत्रकारितेला चांगले दिवस आणायचे असतील, तर पत्रकारांनी तंत्रज्ञानाची कास धरली पाहिजे. बदल स्वीकारणारी पत्रकारिताच भविष्यात अधिक सक्षम पणे उभी राहील,ङ्ग असे गगन महोत्रा यांनी सांगितले.

गगन महोत्रा म्हणाले,व्हॉईस ऑफ मीडिया च्या पदाधिकारी आणि केवळ सदस्य पत्रकारांसाठी आम्ही आगामी काळात नवीन व्यावसायिक संधी घेऊन येत आहोत. या संधीच्या माध्यमातून पत्रकारांना पत्रकारितेचे काम करता करता आर्थिक उत्पन्नही मिळवता येईल, असा महत्त्वाकांक्षी उपक्रम हाती घेण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे.

आजचा काळ तंत्रज्ञानाचा आहे. आता मोठ्या शहरांमध्ये जाऊनच काम करण्याची गरज नाही, तर आपल्या गावातून, आपल्या परिसरातून आणि आपल्या गल्लीतून काम करूनही चांगले उत्पन्न मि ळवण्याच्या संधी उपलब्ध होत आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून पत्रकारांसाठी अशाच नव्या संधी निर्माण करण्याच्या दिशेने व्हॉईस ऑफ मीडिया पावले उचलत आहे. पत्रकारितेची ओळख कायम ठेवत पत्रकारांना आर्थिकदृष्ट्याही सक्षम करण्याचा हा उपक्रम केवळ व्हॉईस ऑफ मीडिया च्या पदाधिकारी आणि सदस्य पत्रकारांसाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. यावेळी देशाच्या राष्ट्रीय संघटक सारिका पन्हाळकर यांनी विकसित पत्रकारितेची संकल्पना स्पष्ट करताना पत्रकारितेच्या विकासासाठी नवीन विचार, कौशल्यवृद्धी आणि बदलत्या काळानुसार ठोस पावले उचलण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले. ङ्गविकसित पत्रकारितेचे स्वप्न प्रत्यक्षात आणायचे असेल, तर आजपासूनच ठोस आणि सकारात्मक पावले उचलावी लागतील, असे सारिका पन्हाळकर यांनी स्पष्ट केले.

विलास बडे यांनी पत्रकारितेच्या मूलभूत मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले. तंत्रज्ञान कितीही प्रगत झाले, माध्यमांचे स्वरूप कितीही बदलले तरी पत्रकारितेतील सत्य, विश्वासार्हता, नैतिकता आणि सामाजिक बांधिलकी ही मूल्ये कायम जपली पाहिजेत, असे त्यांनी सांगितले. तंत्रज्ञान कितीही पुढे गेले तरी पत्रकारितेची खरी ताकद तिच्या मूल्यांमध्ये आहे. पत्रकारांनी पत्रकारितेची मूल्ये अंगीकारून समाजासमोर आदर्श निर्माण केला पाहिजे, असे विलास बडे यांनी सांगितले.

आंतरराष्ट्रीय महासचिव दिव्या भोसले यांनी जगभरात सुरू असलेले काम कसे चालते हे समोर ठेवले.

व्हॉईस ऑफ मीडिया व्ही ओ एम इंटरनॅशनल फोरमचे राष्ट्रीय अध्यक्ष अनिल म्हस्के यांनी पत्रकारांच्या हितासाठी आगामी काळात अनेक महत्त्वपूर्ण पावले उचलली जाणार असल्याचे स्पष्ट केले. पत्रकारांच्या विविध प्रश्नांवर संघटितपणे काम करण्याबरोबरच त्यांच्या भविष्याच्या दृष्टीने ठोस उपक्रम राबविण्यावर संघटनेचा भर राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, व्हॉईस ऑफ मीडिया व्ही ओ एम इंटरनॅशनल फोरमचे प्रदेशाध्यक्ष विजय चोरडिया यांनी कॅडर कॅम्पच्या व्यापक आयोजनाची माहिती दिली. परभणी येथून सुरू झालेल्या कॅडर कॅम्पच्या मालिकेने आता मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांना कवेत घेतले आहे. मराठवाड्यानंतर ही कॅडर कॅम्पची चळवळ राज्यभर विस्तारत असून, विदर्भ, कोकण, उत्तर महाराष्ट्र, मुंबई आणि पश्चिम महाराष्ट्र या विभागांम ध्येही कॅडर कॅम्प आयोजित करण्यात येणार आहेत. या संपूर्ण राज्यव्यापी कॅडर कॅम्प मालिकेचा भव्य समारोप २७ सप्टेंबर रोजी बुलढाणा येथे होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या मराठवाडा स्तरीय कॅडर कॅम्पचे मराठवाडा अध्यक्ष डॉ. गणेश जोशी यांच्या नेतृत्वाखाली अत्यंत नियोजनबद्ध आणि प्रभावी आयोजन करण्यात आले आहे. कॅडर कॅम्प यशस्वी करण्यासाठी मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांचे पदाधिकारी आणि राज्यस्तरीय नेतृत्व एकजुटीने काम करत असून, त्यांच्या मेहनतीमुळे नांदेडमध्ये संघटनात्मक शक्तीचे प्रभावी दर्शन घडत आहे. या कॅडर कॅम्पमध्ये प्रदेशाध्यक्ष नरेंद्र देशमुख, राज्य सरचिटणीस चेतन कात्रे, नांदेडचे अध्यक्ष तुकाराम सावंत, हिंगोलीचे जिल्हाध्यक्ष रमेश कदम, परभणीचे जिल्हाध्यक्ष कैलास चव्हाण, लातूरचे जिल्हाध्यक्ष संगम कोटलवार, संभाजीनगरचे जिल्हाध्यक्ष कानिफ अन्नपूर्णे, धाराशिवचे जिल्हाध्यक्ष हुंकार बनसोडे, जालन्याचे जिल्हाध्यक्ष राजेश भालेराव आणि बीडचे जिल्हाध्यक्ष जालिंदर धांडे यांच्यासह अनेक मान्यवर पदाधिकारी सहभागी झाले आहेत. नांदेड चे आमदार बालाजी कल्याणकर यांनी देखील यावेळी मार्गदर्शन केले. तसेच राज्याचे सरचिटणीस गजानन देशमुख, सहसरचिटणीस श्रीनिवास भोसले, म राठवाडा संघटक ऋषीकेश कोंडेकर, मराठवाडा उपाध्यक्ष बाळासाहेब पांडे आणि मराठवाडा सरचिटणीस सुनील जोशी यांच्यासह अनेक पदाधिकारी या कॅडर कॅम्पच्या यशासाठी अहोरात्र परिश्रम घेत आहेत. नांदेड येथे सुरू असलेल्या या मराठवाडा स्तरीय कॅडर कॅम्पने केवळ पत्रकारांना मार्गदर्शनाची संधी उपलब्ध करून दिली नसून, म राठवाड्यातील आठही जिल्ह्यांतील पदाधिकाऱ्यांना एकाच व्यासपीठावर आणून संघटनात्मक बांधणीला नवी ऊर्जा दिली आहे.

तंत्रज्ञानाचा स्वीकार, विकसित पत्रकारिता, पत्रकारितेची मूल्ये, पत्रकारांचे भविष्य आणि संघटनात्म क ताकद या महत्त्वपूर्ण सूत्रांवर झालेल्या मार्गदर्शनामुळे हा कॅडर कॅम्प पत्रकारितेला नवी दिशा देणारा ठरत आहे.

# विविध क्रिडा स्पर्धांमध्ये ज्येष्ठांचा उत्फुर्त सहभाग



पुणे दि. १ (प्रतिनिधी) – सुप्रसिद्ध हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त साजरा केल्या जाणाऱ्या राष्ट्रीय क्रिडा दिनानिमित्त पिंपळे सौदागर येथील लिनियर गार्डन ज्येष्ठ नागरिक संघाच्या हास्य क्लबतर्फे आयोजित विविध क्रिडा स्पर्धेत ज्येष्ठ नागरिकांनी उत्फुर्त सहभाग नोंदविला.

मंगळवार दिनांक एक सप्टेंबर रोजी लिनियर गार्डन येथे सकाळी सात ते साडेआठ दरम्यान झालेल्या या उपक्रमात संघाचे अध्यक्ष अशोक वारकर यांच्या मार्गदर्शनाखाली ज्येष्ठांच्या वयोमानानुसार काही बैठे खेळ, प्रश्नमंजुषा, बुध्दीला चालना देणारी कोडी, गाण्यांच्या भेंड्या, संगीत खुर्ची आदि स्पर्धा घेण्यात आल्या.

संगीत खुर्चीच्या खेळात रंजना सावदेकर यांनी प्रथम क्रमांक पटकावला. ज्येष्ठांच्या उत्साहपूर्ण खेळाबद्दल त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी चॅलेंजर पब्लिक स्कूलचे संचालक आणि सामाजिक कार्यकर्ते संदीप काटे, उन्नती सोशल फाउंडेशनचे संस्थापक संजय भिसे, आरबीएल बँकेचे पिंपळे सौदागर येथील शाखा व्यवस्थापक राजवीर गील यांनी प्रमुख उपस्थिती दर्शविली.

या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी पांडुरंग कांबळे, दगाजी पाटील, ॲड. प्रदिप बादगुडे, अश्विनी शेकटकर, छाया वारकर, शरदकांत नेरकर, किशोर देशमुख, सुरेश बर्डे, रमेश काळे, रवींद्र संधानशिवे, सुरेश अकोले या संघाच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. स्पर्धांच्या समन्वयक म्हणून सलोनी वानखेडे यांनी काम पाहिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि आभार प्रदर्शन संघाचे अध्यक्ष अशोक वारकर यांनी केले.

# पुन्हा निर्भया... दिल्लीत धावत्या बसमध्ये १६ वर्षीय विद्यार्थिनीवर सामूहिक अत्याचार, ड्रायव्हर-कंडक्टरला अटक

नवी दिल्ली, दि. १ (वृत्तसंस्था) – देशाची राजधानी दिल्ली पुन्हा एकदा सामूहिक बलात्काराच्या घटनेने हादरली आहे. उत्तर प्रदेशातून आपल्या भावाला भेटण्यासाठी निघालेल्या एका १६ वर्षांच्या अल्पवयीन विद्यार्थिनीवर धावत्या स्लीपर बसमध्ये सामूहिक बलात्कार करण्यात आल्याची संतापजनक घटना समोर आली आहे. लिफ्ट देण्याच्या बहाण्याने बसचालक आणि कंडक्टरने या मुलीला बसमध्ये बसवले आणि तिच्यावर अत्याचार केला. याप्रकरणी दिल्लीतील काश्मिरी गेट पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक केली आहे.

पीडित मुलगी उत्तर प्रदेशातील मैनपुरी जिल्ह्यातील असून ती इयत्ता ११ वीत शिकते. ४ ऑगस्टच्या रात्री ती घरात कोणालाही न सांगता नोएडाम ध्ये राहणाऱ्या आपल्या चुलत भावाला भेटण्यासाठी निघाली होती. मुसळधार पाऊस आणि अंधारामुळे ती रस्ता भटकली आणि ग्रेटर नोएडामधील परी चौक येथे चुकीने उतरली.

बस सुरू झाल्यानंतर अवघ्या काही वेळातच कंडक्टरने मुलीशी अश्लील चाळे करण्यास सुरुवात केली. त्यानंतर चालक आणि कंडक्टर या दोघांनी तिच्यावर आळीपाळीने बलात्कार केला. मुलीने विरोध करण्याचा प्रयत्न केला असता, तिला जिवे मारण्याची धमकी देण्यात आली. त्यानंतर काश्मिरी गेट आयएसबीटी जवळील रिंग रोडवर पीडितेला फेकून देऊन आरोपींनी पळ काढला. पीडितेने तात्काळ काश्मिरी गेट पोलीस ठाणे गाठले व आपबिती सांगितली.

देशाची राजधानी दिल्ली पुन्हा एकदा सामूहिक बलात्काराच्या घटनेने हादरली आहे. उत्तर प्रदेशातून आपल्या भावाला भेटण्यासाठी निघालेल्या एका १६ वर्षांच्या अल्पवयीन विद्यार्थिनीवर धावत्या स्लीपर बसमध्ये सामूहिक बलात्कार करण्यात आल्याची संतापजनक घटना समोर आली आहे. लिफ्ट देण्याच्या बहाण्याने बसचालक आणि कंडक्टरने या मुलीला बसमध्ये बसवले आणि तिच्यावर अत्याचार केला. याप्रकरणी दिल्लीतील काश्मिरी गेट पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक केली आहे. पीडित मुलगी उत्तर प्रदेशातील मैनपुरी जिल्ह्यातील असून ती इयत्ता ११ वीत शिकते. ४ ऑगस्टच्या रात्री ती घरात कोणालाही न सांगता नोएडाम ध्ये राहणाऱ्या आपल्या चुलत भावाला भेटण्यासाठी निघाली होती. मुसळधार पाऊस आणि अंधारामुळे ती रस्ता भटकली आणि ग्रेटर नोएडामधील परी चौक येथे चुकीने उतरली.

# गं. भा. गंगाबाई हिरालालसिंह राजपूत यांचे निधन



वैजापूर, दि. १ (प्रतिनिधी) – येथील राजपूत –परदेशी समाजाच्या जेष्ठतम महिला सदस्या गं. भा. गंगाबाई हिरालालसिंह सिसोदिया राजपूत यांचे वृद्धापकाळाने मंगळवार (ता.०१) रोजी निधन झाले.मृत्यू समयी त्या ८१वर्षाच होत्या त्यांच्या मागे एक विवाहित कन्या नातवंडे असा परीवार आहे. येथील अमरधाममध्ये त्यांच्या पार्थिवावर अंतिम संस्कार करण्यात आले.

माजी नगराध्यक्ष राजुसिह राजपूत, विनोद राजपूत, ठाकूर धोंडीरामसिंह राजपूत, गोकुलसिंह राजपूत यांनी श्रद्धांजली अर्पण केली. सेवा निवृत्त प्राचार्य डॉ.व्ही.एन. ढाकरे यांच्या त्या सासूबाई होतं.

# राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त मनपा खेळाडूंचा गौरव ‘शालेय क्रीडा स्पर्धा माहिती पुस्तिकेचे’ अनावरण

छत्रपती संभाजीनगर, दि. १ (प्रतिनिधी) – राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वतीने मनपा शाळांतील राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंत खेळाडूंचा आज मनपा मुख्यालयातील प्रशासकीय सभागृहात गौरव करण्यात आला. यावेळी ‘शालेय क्रीडा स्पर्धा माहिती पुस्तिकेचे’ अनावरण करण्यात आले.



महापौर समीर राजूरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमास विरोधी पक्षनेते अब्दुल समीर साजिद, गटनेता किशोर नागरे, नगरसेवक राज गौरव वानखेडे, शिवाजी दांडगे, काकासाहेब काकडे, सुनील जगताप, मयूर वंजारी, मतीन पटेल, मतीन खान, मनपा आयुक्त अमोल येडगे,

अतिरिक्त आयुक्त रणजित पाटील, उपायुक्त अंकुश पांढरे, क्रीडा विभाग प्रमुख विजय पाटील, शिक्षण विस्तार अधिकारी खान रईसा बेगम यांची उपस्थिती होती.

**राज्यस्तरीय गुणवंत खेळाडूंचा गौरव**

मनपा शाळांमध्ये शिक्षण घेत असताना विविध क्रीडा प्रकारांत राज्यस्तरावर उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा स्मृतिचिन्ह व गौरवपत्र देऊन सन्मान करण्यात आला. यामध्ये पृथ्वीराज नलावडे – तलवारबाजी, पूर्वा जोगदंडे, सायली हिवाळे, खुशी एकलहरे व फरान शेख – रायफल शूटिंग, प्रणव गुंजाळ – कुस्ती, श्लोक गायकवाड – कॅरम, शिवराज चव्हाण – तलवारबाजी, श्रावणी तुपे – बास्केटबॉल, मैथिली उंटवाल – जलतरण, जीशान शेख व जर्जिस शेख – बॉल बॅडमिंटन तसेच सारा एस.के. युनूस, इफा इफ्तेखार खान, उम्मे कुलसुम सय्यद नजीब, हुमा जावेद, आफिया, सुमेस्सा, जिक्रा जुबेर आणि मोहम्मद हुसेन – कराटे या खेळाडूंचा सम ावेश आहे. या खेळाडूंनी विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत मनपा शाळांसह छत्रपती संभाजीनगर म हानगरपालिकेचे नाव उज्ज्वल केले आहे. उपस्थित मान्यवरांनी सर्व खेळाडूंचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील क्रीडा वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

**क्रीडा प्रशिक्षकांचाही सन्मान**

विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्रात घडविण्यासाठी योगदान देणारे समीर शेख, अरबाज खान, सचिन लवरिया, सचिन परदेशी, इरफान सय्यद आणि हरिदास मस्के यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या क्रीडा कौशल्याला योग्य दिशा देण्यात प्रशिक्षकांची भूमिका महत्त्वाची असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

**‘शालेय क्रीडा स्पर्धा माहिती पुस्तिकेचे’ अनावरण**

मनपा शाळांमध्ये वर्षभर आयोजित करण्यात येणाऱ्या विविध क्रीडा स्पर्धा व उपक्रमांची माहिती विद्यार्थ्यांना, शिक्षकांना आणि क्रीडा मार्गदर्शकांना उपलब्ध व्हावी, या उद्देशाने ‘शालेय क्रीडा स्पर्धा माहिती पुस्तिका’ तयार करण्यात आली आहे. या पुस्तिकेत विविध क्रीडा प्रकार, स्पर्धांचे नियोजन, विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध क्रीडा संधी तसेच स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी आवश्यक माहिती देण्यात आली आहे. त्यामुळे मनपा शाळांमधील क्रीडा उपक्रमांना अधिक शिस्तबद्ध, नियोजनबद्ध आणि व्यापक स्वरूप मिळण्यास मदत होणार आहे.

**‘फिट संभाजीनगर’च्या माध्यमातून क्रीडा संस्कृतीला चालना**

यावेळी महापौर समीर राजूरकर यांनी शहरातील उपलब्ध मैदाने विकसित करून त्या माध्यमातून क्रीडा क्षेत्राला चालना देण्याची गरज व्यक्त केली. प्रत्येक नागरिकाने दररोज किमान एक तास व्यायाम किंवा चालण्यासाठी द्यावा, यासाठी ‘फिट संभाजीनगर’ ही संकल्पना राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या उपक्रमासाठी विद्यार्थ्यांना ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून सहभागी करून नागरिकांना नियमित व्यायाम व क्रीडेसाठी प्रोत्साहित करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. महापौरांनी क्रीडा स्पर्धांमध्ये यश मि ळविणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. तसेच नगरसेवक आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांचा समावेश असलेली क्रीडा विषयक समिती लवकरच स्थापन करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**प्रत्येक विद्यार्थ्याने किमान एका खेळात सहभागी व्हावे आयुक्त अमोल येडगे**

मनपा आयुक्त अमोल येडगे म्हणाले की, मनपा शाळांचे वैशिष्ट्य म्हणजे अनेक शाळांची ओळख विशिष्ट क्रीडा प्रकाराशी जोडलेली आहे. टेबल टेनिस शाळा, फुटबॉल शाळा, बॅडमिंटन शाळा अशा माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध खेळांचे प्रशिक्षण व संधी उपलब्ध करून दिल्या जात आहेत. यावर्षी मनपा शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याने किमान एका क्रीडा स्पर्धेत सहभागी व्हावे, यासाठी संबंधित शिक्षक व प्रशिक्षकांनी आवश्यक नियोजन करावे, असे निर्देश त्यांनी दिले.

‘फिट संभाजीनगर’ संकल्पनेची अंमलबजावणी सुरू करण्यात आली असून, शहरातील जिम, क्रीडांगणे, उद्याने तसेच चालण्यासाठी उपलब्ध असलेल्या ठिकाणी नागरिकांनी दररोज किमान एक तास शारीरिक व्यायामासाठी द्यावा, यासाठी प्रोत्साहन देण्यात येणार असल्याचे आयुक्तांनी सांगितले.

मनपा शाळांमधून भविष्यात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रतिनिधित्व करणारे खेळाडू घडावेत, यासाठी ऑलिम्पिक क्रीडा प्रकारांसह विविध खेळांचे प्रशिक्षण, स्पर्धेच्या संधी आणि आवश्यक मार्गदर्शन विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात येत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या उपक्रमासाठी क्रीडा अधिकारी संजीव बालय्या, कार्यक्रमाधिकारी ज्ञानदेव सांगळे आणि क्रीडा मार्गदर्शक सागर मगरे प्रयत्नशील आहेत. त्यांच्या मार्गदर्शनातून मनपा शाळांतील विद्यार्थ्यांना विविध क्रीडा प्रकारांचे प्रशिक्षण देऊन स्थानिक, जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांसाठी तयार करण्यात येत आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्ञानदेव सांगळे यांनी केले,

# श्रावण महिना कालावधीत वेरुळ गावात वाहन बंदी

छत्रपती संभाजीनगर, दि. ३१ (प्रतिनिधी) – श्रावण म हिन्यात वेरुळ येथील श्री घृष्णेश्वर मंदिरात होणारी भाविकांची गर्दी पाहता भगवान महावीर चौक ते मालोजीराजे भोसले चौक हा रस्ता सर्व प्रकारच्या वाहनांसाठी बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी निर्गमित केले आहेत.

या आदेशान्वये दि.४ ते ८ सप्टेंबर या कालावधीत रात्री ८ ते दुसऱ्या दिवशी सकाळी ८ वाजेपर्यंत वेरूळ येथील भगवान महावीर चौक ते मालोजीराजे भोसले चौक हा रस्ता सर्व प्रकारच्या वाहनांसाठी बंद (नो व्हेईकल झोन) राहणार आहे. भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी भगवान महावीर चौक व मालोजीराजे भोसले चौकाच्या पलीकडे वाहनांच्या पार्किंगसाठी मोकळी जागा व पार्किंग व्यवस्था निश्चित करण्यात आली आहे. तेथे वाहनधारकांना आपली वाहने पार्किंग करता येतील.

मोटार वाहन कायदा कलम ११५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्य किंवा केंद्र शासनाच्या मालकीची वाहने तसेच पोलीस, अग्निशमन दल, रुग्णवाहिका व अन्य अत्यावश्यक सेवेतील वाहनांना या आदेशातून वगळण्यात आले आहे, असेही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. भाविकांनी सहकार्य करावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

सोमवार खेरीज दररोज
प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक
श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
यांनी सोलापूर तरुणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# 'डीजे'मुक्त, सुरक्षित,पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी सर्व घटकांनी समन्वय राखावा-जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी

## गणेश मंडळांसाठी स्पर्धा उत्कृष्ट मंडळांना तालुका व जिल्हास्तरावर पुरस्कार

छत्रपती संभाजीनगर दि.१ (प्रतिनिधी)- यंदाचा गणेशोत्सव 'डीजे' मुक्त, सुरक्षित व पर्यावरणपूरक करण्यावर भर द्यावयाचा आहे. त्यासाठी जिल्हा प्रशासन, पोलीस, स्थानिक स्वराज्य संस्था, सार्वजनिक गणेश मंडळे आणि नागरिक अशा सर्व घटकांचा समन्वय राखावा, असे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी आज दिले.

यंदा उत्कृष्ट गणेश मंडळांसाठी राज्य शासनाने स्पर्धाही आयोजीत केल्या असून तालुका, जिल्हा पातळीवर पुरस्कार देण्यात येणार आहेत. त्यातही गणेश मंडळांनी सहभागी व्हावे असे आवाहनही जिल्हाधिकारी गौडा यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात आज सार्वजनिक गणेशोत्सवाच्या अनुषंगाने सर्व शासकीय विभागांची समन्वय बैठक आज पार पडली.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मित्रू पी. एम., जिल्हा पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव, अपर जिल्हाधिकारी संभाजी अडकुणे, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्धन विधाते तसेच सर्व उपविभागीय अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी, नगरपालिका मुख्याधिकारी व सर्व संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. क्षेत्रीय अधिकारी दूरदृश्यप्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले होते.

गणेशोत्सव कालावधीत ध्वनीप्रदुषण रोखण्यासाठी तसेच पावित्र्य राखण्यासाठी सार्वजनिक गणेश मंडळांनी 'डीजे'चा वापर टाळून पारंपरिक वाद्यांना प्राधान्य द्यावे. गणेश मंडळांशी प्रशासनाने संवाद ठेवून आवश्यक सूचना व मार्गदर्शन करावे, असे जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी यांनी सांगितले.

सामाजिक उपक्रम, पर्यावरणपूरकता, स्वच्छता आणि सुरक्षिततेला प्रोत्साहन देण्यासाठी उत्कृष्ट सार्वजनिक गणेश मंडळांना तालुका व जिल्हास्तरावर पुरस्कार देण्यात येणार आहेत. तालुकास्तरावर प्रथम क्रमांक प्राप्त करणाऱ्या गणेश मंडळास २५ हजार रुपये, तर जिल्हास्तरावर प्रथम क्रमांकासाठी ५० हजार रुपये, द्वितीय क्रमांकासाठी ४० हजार रुपये आणि तृतीय क्रमांकासाठी ३० हजार रुपये बक्षीस देण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी गौडा यांनी दिली. याबाबत प्रचार करुन अधिकाधिक मंडळांना सहभागी करुन घ्यावे,असे निर्देश जिल्हाधिकारी गौडा यांनी दिले.



तालुकास्तरावर आवश्यक समित्या स्थापन कराव्यात. या समित्यांनी सार्वजनिक गणेश मंडळांशी समन्वय साधून बैठका घ्याव्यात. पोलीस प्रशासनाच्या सहभागातून मंडळांना सुरक्षा, वाहतूक, पार्किंग व विसर्जन व्यवस्थेबाबत आवश्यक मार्गदर्शन करावे, असे निर्देश त्यांनी दिले.

सार्वजनिक गणेश मंडळांनी मंडप उभारणीपासून विसर्जनापर्यंत सुरक्षिततेच्या सर्व निकषांचे काटेकोर पालन करावे. मंडपाच्या ठिकाणी अग्निप्रतिबंधक उपाययोजना, सुरक्षित विद्युत व्यवस्था, आपत्कालीन व्यवस्थापन, स्वच्छता व आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध असाव्यात. गर्दीच्या ठिकाणी वाहतुकीची कोंडी होणार नाही यासाठी वाहतूक नियमन व पार्कींगचे आगाऊ नियोजन करावे.

आगमन व विसर्जन मिरवणुकी दरम्यान आवश्यक पोलीस बंदोबस्त ठेवावा. मिरवणूक मार्ग, गर्दीची संभाव्य ठिकाणे, पार्कींगची ठिकाणे, पर्यायी वाहतूक मार्ग निश्चित करून सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे जिल्हाधिकारी गौडा यांनी सांगितले.

विसर्जनस्थळी सुरक्षा,प्रकाश व्यवस्था, वैद्यकीय पथके, रुग्णवाहिका इ. सज्ज ठेवावीत. विसर्जनानंतर तातडीने स्वच्छता मोहीम राबवावी. जलप्रदूषण टाळण्यासाठी जनजागृती करावी. पर्यावरणपूरक गणेशमूर्ती व नैसर्गिक साहित्याच्या वापराला प्रोत्साहन द्यावे, असेही त्यांनी सांगितले. जिल्ह्यातील सर्व सार्वजनिक गणेश मंडळांची संपर्क यादी अद्यावत ठेवावी. महसूल, पोलीस व स्थानिक स्वराज्य संस्थांनी मंडळांशी नियमित संपर्क ठेवावा. तालुकास्तरावर मंडळांच्या बैठका घेऊन त्यांना सर्व व्यवस्थेबाबत आवश्यक सूचना द्याव्या.

अन्न व औषध प्रशासनाने मंडळांतर्फे वाटप होत असलेला प्रसाद तसेच या कालावधीत बाजारात प्रसादासाठी म्हणून विक्री होत असलेल्या मिठाईची विशेष तपासणी करावी. प्रसाद वाटपासाठी मंडळांनी परवाना घेणे आवश्यक आहे. त्यासाठी मंडळांना सहकार्य करावे. खाद्यपदार्थांची गुणवत्ता तपासून भेसळयुक्त पदार्थांची विक्री व प्रसाद म्हणून वाटप होणार नाही, याची खबरदारी घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी गौडा यांनी दिले.

जिल्हा पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांनी विसर्जनाच्या दृष्टीने महत्त्वाच्या ठिकाणांवरील व्यवस्थेबाबत सूचना दिल्या.

गंगापूर तालुक्यातील कायगाव टोका परिसरातील विसर्जनस्थळी भाविकांची गर्दी लक्षात घेऊन पुरेशी प्रकाश व्यवस्था व आवश्यक सुरक्षा उपाययोजना कराव्यात. स्थानिक यंत्रणांनी या ठिकाणी विशेष लक्ष देऊन विसर्जन प्रक्रिया सुरक्षित व सुरळीत पार पडेल यासाठी आवश्यक नियोजन करावे, असे त्यांनी सांगितले. तसेच याकालावधीत सामाजिकदृष्ट्या संवेदनशील [illegible] प्रतिबंधात्मक कारवाईची प्रकरणे तातडीने निकाली काढावीत.

# प्रतिबंधित प्लॅस्टिकविरोधात मनपाची बेधडक कारवाई; राजेश्वरी प्लास्टिककडून ३२५० किलोपेक्षा अधिक प्लॅस्टिक जप्त

## पानदरीबा येथील कारवाईत २५,०००/- दंड; ६ लाखांपेक्षा अधिक किमतीचा प्लॅस्टिक साठा जप्त, १० लाखापेक्षा जास्त प्लास्टिक कॅरीबॅग वापरापासून रोखल्या

छत्रपती संभाजीनगर दि.१ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाने प्रतिबंधित प्लॅस्टिकविरोधातील मोहीम तीव्र केली असून, पानदरीबा येथील राजेश्वरी प्लास्टिक या प्रतिष्ठानावर धडक कारवाई करण्यात आली. या कारवाईत ३२५० किलोपेक्षा अधिक प्रतिबंधित प्लॅस्टिक जप्त करण्यात आले असून, त्याची अंदाजे किंमत ६ लाख रुपयांपेक्षा अधिक आहे. संबंधित प्रतिष्ठानावर २५,०००/- दंड आकारण्यात आला.



तपासणीदरम्यान मोठ्या प्रमाणात प्लॅस्टिक कॅरीबॅगचा साठा आढळून आला. १० लाखांपेक्षा अधिक प्लॅस्टिक कॅरीबॅग जप्त करून त्यांची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यात आली आहे. जप्त केलेले प्रतिबंधित प्लॅस्टिक नियमानुसार प्रक्रियेसाठी पाठविण्यात आले आहे.

ही कारवाई आयुक्त अमोल येडगे यांच्या आदेशाने व घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त नंदकिशोर भोंबे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. स्वच्छता अधिकारी अनिल जाधव, स्वच्छता निरीक्षक पंडित दाभाडे, नागरिक मित्र पथकाचे देविदास सुसर, बालाजी साबळे, सुवर्णसिंग परदेशी, जनार्दन सांगळे, संतोष बनकर, ज्ञानेश्वर पाटील, किशन निकम, जयेश मगरे तसेच स्वच्छता जवान दीपक पडुळ, सुभाष दाभाडे, बाबू जाधव व किशोर मगरे यांनी कारवाई केली.

महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून सुरू असलेल्या विविध कारवायांमध्ये आतापर्यंत ३७ टनांपेक्षा अधिक प्रतिबंधित प्लॅस्टिक जप्त करून त्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यात आली आहे. प्रतिबंधित प्लॅस्टिकचा वापर, साठवणूक, विक्री व वितरण करणाऱ्यांवर यापुढेही कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे यांनी सांगितले की, 'शहराला प्रतिबंधित प्लॅस्टिकमुक्त करण्यासाठी धडक कारवाई सुरू आहे. यापुढे प्रतिबंधित प्लॅस्टिकचा साठा किंवा विक्री आढळून आल्यास केवळ दंडात्मक कारवाई न करता, नियमानुसार गुन्हाही दाखल करण्यात येणार आहे. प्रतिबंधित प्लॅस्टिकला कोणत्याही परिस्थितीत थारा दिला जाणार नाही.'

महापौर समीर राजूरकर यांनी शहरवासीयांना आवाहन केले की, 'नागरिकांनी दैनंदिन खरेदीसाठी प्लॅस्टिक कॅरीबॅगचा वापर पूर्णपणे टाळून कापडी, कागदी किंवा इतर पर्यावरणपूरक पिशव्यांचा वापर करावा. यामुळे पर्यावरणाचे रक्षण होण्यासोबतच शहर स्वच्छ ठेवण्यास मोठा हातभार लागेल. नागरिकांनी महानगरपालिकेच्या प्रतिबंधित प्लॅस्टिकविरोधी मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा.'

# मेक इन इंडियाला बळ! आरआरपी डिफेन्स भारतासाठी आणणार 'डायमंड' एआय सर्व्हेलन्स तंत्रज्ञान

मुंबई दि.१ (प्रतिनिधी)- भारतीय संरक्षण क्षेत्रात स्वदेशी उत्पादन आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाला नवी दिशा देण्याच्या दृष्टीने एक अत्यंत महत्त्वाचा करार झाला आहे. भारतातील अग्रगण्य संरक्षण उत्पादन कंपनी 'आरआरपी डिफेन्स लिमिटेड'आणि जागतिक स्तरावर नावाजलेली इलेक्ट्रो-ऑप्टिकल सिस्टीम डेव्हलपर कंपनी 'ईएससी बाज' यांनी भारतात एका विशेष भागीदारीची घोषणा केली आहे. या करारांतर्गत इस्त्रायलचे जगप्रसिद्ध 'डायमंड - युनिक ऑब्झर्व्हेशन सिस्टीम'हे 'एआय' आधारित अत्याधुनिक तंत्रज्ञान भारतात आणले जाणार आहे.

**काय आहे 'डायमंड' तंत्रज्ञान?**

'डायमंड' ही एक अत्यंत प्रगत आणि बुद्धिमत्ता आधारित सर्व्हेलन्स यंत्रणा आहे. या यंत्रणेचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे काळ्याकुट्ट अंधारातही ही सिस्टीम 'दिवसासारखे' स्पष्ट आणि उच्च दर्जाचे दृश्य दाखवू शकते.

८० अंश अँगल आणि हाय-रिझोल्युशन : ८० डिग्री फील्ड ऑफ व्ह्यू आणि ४२४० × २८३२ रिझोल्युशनसह हे तंत्रज्ञान काम करते.

आर्टिफिशियल इंटेलिजन्स सपोर्ट : एआयच्या मदतीने धोक्याची किंवा घुसखोरीची ओळख अत्यंत वेगाने आणि अचूकतेने केली जाते.

अष्टपैलू वापर : सीमा सुरक्षा, लष्करी तळ, संवेदनशील पायाभूत सुविधा आणि तातडीच्या सुरक्षेसाठी हे तंत्रज्ञान वॉच टॉवर्ससह फिरत्या वाहनांवर सहज तैनात करता येते.

**अथांग आर्थिक अन् व्यावसायिक संधी**

जागतिक पातळीवर लष्करी इलेक्ट्रो-ऑप्टिकल आणि इन्फ्रारेड सर्व्हेलन्सची बाजारपेठ सध्या ११.१ अब्ज डॉलर्सच्या (अंदाजे ९०,००० कोटी रुपये) घरात आहे. एकट्या भारतात या तंत्रज्ञानासाठी ५८० दशलक्ष डॉलर्सची (अंदाजे ४,८०० कोटी रुपये) मोठी संधी उपलब्ध आहे. आरआरपी डिफेन्सच्या प्राथमिक अंदाजानुसार, या नवीन व्यावसायिक विभागातून कंपनीच्या एकूण संभाव्य उत्पन्नात तब्बल ३० टक्के वाढ होऊ शकते.

**'मेक इन इंडिया' ते 'मेक इन इंडिया, सेल टू द वर्ल्ड'**

विदेशी तंत्रज्ञान आयात करण्यापुरता हा करार मर्यादित नसून, 'मेक इन इंडिया'च्या धोरणानुसार या प्रगत तंत्रज्ञानाचे भारतात उत्पादन करणे, स्थानिक पातळीवर सुधारणा करणे आणि येथून जागतिक बाजारपेठेत निर्यात करणे हे या दोन्ही कंपन्यांचे मुख्य उद्दिष्ट आहे.


'हा करार केवळ आमच्या पोर्टफोलिओमध्ये नवीन उत्पादन जोडण्यापुरता नाही. डायमंड तंत्रज्ञानामुळे आम्हाला संरक्षण आणि सुरक्षा क्षेत्रातील एका अत्यंत विशेष आणि प्रगत विभागामध्ये काम करण्याची संधी मिळत आहे. भारतात उत्पादन करून जागतिक स्तरावर निर्यात करण्याचे आमचे स्वप्न आहे', या करारावर बोलताना आरआरपी डिफेन्सच्या व्यवस्थापनाने स्पष्ट केले आहे.

बदलत्या जागतिक परिस्थितीमध्ये सीमा सुरक्षा आणि लष्करी तळांचे रक्षण करण्यासाठी २४ तास नजर ठेवणे ही आता गरज बनली आहे. या पार्श्वभूमीवर आरआरपी डिफेन्स आणि ईएससी बाजची ही भागीदारी भारताच्या सुरक्षिततेसाठी मैलाचा दगड ठरणार आहे.

# 'स्वच्छ कार्यालय–निरोगी, सकारात्मक आणि कार्यक्षम वातावरण' मोहिमेला प्रारंभ

## विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांचा पुढाकार; दर सोमवारी एक तास श्रमदान





छत्रपती संभाजीनगर दि.१ (प्रतिनिधी)- कार्यालयीन परिसर स्वच्छ, सुंदर व आरोग्यदायी ठेवण्यासोबतच अधिकारी-कर्मचाऱ्यांमध्ये स्वच्छतेची भावना रुजविण्यासाठी विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्या संकल्पनेतून 'स्वच्छ कार्यालय–निरोगी, सकारात्मक आणि कार्यक्षम वातावरण' या मोहिमेला आज प्रारंभ झाला. विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी विभागीय आयुक्त कार्यालयाच्या परिसरात स्वतः स्वच्छता उपक्रमात सहभागी होत मोहिमेची सुरुवात केली.

'स्वच्छ कार्यालय ही केवळ जबाबदारी नसून सकारात्मक आणि कार्यक्षम कार्यसंस्कृतीची सुरुवात आहे,' असे सांगून विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले. कार्यालयीन परिसर स्वच्छ व निरोगी ठेवण्यासाठी प्रत्येकाने आपली जबाबदारी स्वीकारणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

या उपक्रमांतर्गत दर सोमवारी सकाळी १० ते ११ या वेळेत एक तास श्रमदान करण्यात येणार आहे. सर्व अधिकारी आपल्या अधिनस्त कर्मचारीवर्गासह या उपक्रमात सहभागी होणार असून, कार्यालयीन परिसर, सभोवतालची जागा तसेच कामकाजाच्या ठिकाणी स्वच्छता राखण्यावर भर देण्यात येणार आहे.

'स्वच्छता हीच सेवा' या भावनेतून राबविण्यात येणाऱ्या या मोहिमेमुळे कार्यालयीन परिसर अधिक स्वच्छ, सुंदर व प्रसन्न होण्यास मदत होणार आहे. स्वच्छ व सकारात्मक वातावरणामुळे अधिकारी-कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढण्यासोबतच विविध कामांसाठी कार्यालयात येणाऱ्या नागरिकांनाही प्रसन्न वातावरणाचा अनुभव मिळणार आहे.

ही मोहीम केवळ एकदाच न राबविता नियमितपणे दर सोमवारी एक तास श्रमदानातून राबविण्यात येणार आहे. याशिवाय कार्यालयीन स्वच्छता व परिसराचे सुशोभीकरण यासाठी विविध उपक्रम सातत्याने राबविण्यात येणार आहेत. प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्याने आपल्या कार्यस्थळाची स्वच्छता, नीटनेटकेपणा व परिसराची निगा राखण्याची जबाबदारी स्वीकारावी, असा संदेश या मोहिमेतून देण्यात आला.

मोहिमेच्या प्रारंभी विभागीय आयुक्त कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत कार्यालयीन परिसराची स्वच्छता केली.

यावेळी सह आयुक्त (अपील-२) खुशालसिंह परदेशी, सह आयुक्त (अपील-१) प्रताप काळे, सह आयुक्त (महसूल) रिता मैत्रेवार, सह आयुक्त (सामान्य प्रशासन) मंजुषा मिसकर, सह आयुक्त (नगर परिषद प्रशासन) देविदास टेकाळे, उपायुक्त (पुरवठा) सुधाकर पवार, उपायुक्त (नियोजन) सुनील सूर्यवंशी, सहायक आयुक्त (मावक) सरिता सूत्रावे, सहायक आयुक्त (महसूल) शुभांगी आंधळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (रोहयो) उद्धव होळकर, सहायक आयुक्त (विकास नियोजन) ज्ञानोबा मोकाटे, उपायुक्त (नगर परिषद प्रशासन) सविता हरकर, सहायक आयुक्त (नगर परिषद प्रशासन) सय्यद कंकर, तहसीलदार (सामान्य प्रशासन) किसन भदाणे, तहसीलदार (महसूल) सुनंदा पारवे यांच्यासह विभागीय आयुक्त कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

दर सोमवारी श्रमदानातून स्वच्छता आणि सातत्यपूर्ण उपक्रमांच्या माध्यमातून कार्यालयीन परिसर स्वच्छ, सुंदर आणि नागरिकांसाठी अधिक सकारात्मक बनविण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

## मनोज जरांगेंची प्रकृती खालावली,...

२४तासांत चर्चा करून मार्ग काढला जाईल. त्यांनी कोणाच्या सांगण्यावरून गैरसमज करून घेऊ नयेत. ओबीसींचे आरक्षण कमी न करता मराठा समाजाला आरक्षण देणे. मराठा समाजाने आंदोलनासाठी मुंबईत येऊ नये, यासाठीही सरकार प्रयत्नशील आहे. ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांच्याशीही मुंबईत आंदोलन करू नये यासाठी चर्चा करण्यात येणार आहे. लाड म्हणाले, काही अधिकारी दिशाभूल करणारी माहिती देत असल्याच्या जरांगेंच्या तक्रारीबाबत मुख्यमंत्र्यांशी चर्चा करण्यात आली. त्याची योग्य ती दखल घेतली जाईल.

सांगोला विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार शहाजी बापू पाटील हे मनोज जरांगे पाटील यांच्या भेटीसाठी अंतरवाली सराटीत दाखल झाले. यावेळी, मनोज जरांगे पाटील यांची खालावलेली प्रकृती पाहून शहाजी बापू पाटील यांना अश्रू अनावर झाल्याचं दिसून आलं. तसेच, थेट मंत्री शंभुराजे देसाई यांना कॉल करून मनोज जरांगे पाटल ांची प्रकृती बघवत नसल्याचंही शहाजी बापूंनी म्हटलं. आमच्या पोरांनी जगायचं कसं? देशभरातील मराठा समाजाचे डोळे आणि कान अंतरवलीकडे लागले आहेत, एकनाथ शिंदे साहेब तळमळीने प्रयत्न करत आहे, पांडुरंगाची शप्पथ घेऊन सांगतो, असेही शहाजी बापूंनी म्हटले.

## मुंबईला जाणारा ओबीसींचा...

ठाम असताना दुसरीकडे हाकेंच्या आंदोलनाला राष्ट्रीय ओबीसी महासंघाचा पाठिंबा नसल्याची भूमिका अध्यक्ष बबनराव तायवाडेंनी मांडलीय. मुळात मराठा आंदोलकांनी मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलनासाठी पोलिसांकडे अर्ज केल्यानंतर ओबीसी आंदोलकांनीही आझाद मैदानावर आंदोलनाची हाक दिली होती. मात्र दोघांना पोलिसांनी परवानगी नाकारली. त्यामुळे जरांगेंनी अंतरवालीत आमरण उपोषण सुरु केलं. तर हाकेंनी मुंबईच्या दिशेनं कूच करण्याचा प्रयत्न केलाय.. आता ओबीसी आंदोलक मागे हटणार की मुंबई गाठणारच याकडे सर्वांचं लक्ष लागलंय.

## ठाकरेंचे १४ आमदार शिंदेंच्या...

खाती आणि मंत्रिपदे देण्यात येणार आहेत. यापैकी काहींची महामंडळ अध्यक्ष आणि राज्यमंत्रीपदी वर्णी लागण्यावर पक्षांतर्गत चर्चा अंतिम टप्प्यात पोहोचल्याची माहितीही समोर आली आहे. नवरात्रीपूर्वी या आमदारांचा पक्ष प्रवेश झाल्यास ठाकरेंच्या शिवसेनेला आणखी एक धक्का बसण्याची शक्यता आहे.

यापूर्वी नुकतंच ठाकरेंच्या शिवसेनेच्या ६ खासदारांनी शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला होता. तो धक्का ताजा असताना आता ही नव्याने चर्चा सुरु झाल्याने ठाकरेंची धाकधूक वाढण्याची शक्यता आहे.

## धनुष्यबाण गोठवण्याची...

युक्तिवाद करताना काही प्रश्न उपस्थित केले असतील तर ते त्यांचे काम आहे. मात्र, शेवटी पक्षाची घटना, देशाची घटना, लोकशाही आणि निवडणूक आयोगाचे अधिकार या सर्व बाबी महत्त्वाच्या आहेत.

शिवसेनेच्या वतीने आता या मुद्द्यांवर उत्तर देण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यामुळे न्यायालयीन प्रक्रियेत काय भूमिका मांडली जाते, याकडे लक्ष असल्याचे त्यांनी सांगितले.

धनुष्यबाण हे चिन्ह गोठवण्याची मागणी केली जात असल्याबाबत शिंदे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. धनुष्यबाण हे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आत्मसन्मानाचा आणि श्रद्धेचा विषय असल्याचे ते म्हणाले. "धनुष्यबाण गोठवण्याची मागणी करणे दुर्दैवी आहे. ज्यांनी शिवसेनाप्रमुखांच्या विचारांना गोठवले, २०१९ मध्ये हिंदुत्वाला गोठवले, महाराष्ट्राच्या जनतेच्या मताला गोठवले, लोकशाहीला गोठवले आणि शिवसेनेच्या घटनेतही बदल केला, त्यांची भूमिका यावरून स्पष्ट होते," असा घणाघात शिंदे यांनी केला. बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांना आणि भूमिकेला महत्त्व देत पुढे जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

## २ कोटी मतदार वगळले,..

यादीतून मतदार वगळण्याच्या मुद्द्यावर घेतली. महाराष्ट्रातील प्रारूप मतदार यादीत सुमारे दोन कोटी मतदार वगळल्याचा दावा त्यांनी केला. मुंबईमध्येच ३६ लाख मतदार कमी झाल्याचे त्यांनी सांगितले.

"दोन कोटी मतदार आणि त्यामध्ये मुंबईतील ३६ लाख मतदार वगळले जाणे ही सामान्य बाब नाही," असे राऊत म्हणाले. काही विशिष्ट समाजांचे किंवा ज्या भागात विरोधकांना अधिक मतदान होण्याची शक्यता आहे, त्या भागातील मतदारांना यादीतून कमी करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

नवी मुंबईमध्ये भाजपच्या कार्यालयात एसआयआरचे हजारो बोगस फॉर्म आढळल्याचा दावा करत हा प्रकार केवळ एका शहरापुरता मर्यादित नसून महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये आणि शहरांमध्ये झाल्याचे राऊत म्हणाले. या प्रकरणाचा आपल्या पक्षाकडून स्वतंत्रपणे अभ्यास सुरू असून त्यासाठी यंत्रणा कामाला लागल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. राऊत यांनी पश्चिम बंगालचा संदर्भ देत तेथेही मोठ्या संख्येने मतदार वगळल्याचा दावा केला. महाराष्ट्रातही मतदार यादीतील बदलांचा परिणाम आगामी निवडणुकांवर होऊ शकतो, अशी भीती त्यांनी व्यक्त केली.

# महाभूमी स्टॅक-एका क्लिकवर मिळणार जमिनीचा सर्च रिपोर्ट

मुंबई दि.१ (प्रतिनिधी)- महाभूमी स्टॅक प्रणालीमुळे राज्यातील सर्व जमिनीच्या मालकीहक्काबाबत एका क्लिकवर माहिती उपलब्ध होणार असल्याने राज्यातील गुंतवणूक आणि आर्थिक विकासाला चालना मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे व्यक्त केला.

महाराष्ट्र राज्य शासनाच्या महसूल व वन विभागामार्फत विकसित करण्यात आलेली भूमी प्रशासनासाठीची महाभूमी स्टॅक प्रणालीचा आज राज्यमंत्रिमंडळ बैठकीनंतर प्रारंभ करण्यात आला. याप्रसंगी मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. याबाबत महसूल विभागाचे अप्पर मुख्य सचिव विकास खारगे यांनी सादरीकरण केले.

जमिनींचे खरेदी- विक्रीचे व्यवहारात आणि व्यवहारानंतर अनेक बाबतीत नागरिकांना महाभूलेख, महाभूनकाशा, आयडीआरएस यासारख्या विविध प्रणालींची मदत घ्यावी लागते. या सर्व विखुरलेल्या प्रणालीचे एकत्रीकरण करून दहा प्रमुख भूमी सेवा श्रेणींसाठी एकच एकात्मिक डिजिटल प्रवेशद्वार महाभूमी स्टॅकच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आली आहे. राज्याच्या महसूल आणि जमीनविषयक सुधारणामधील हा अतिशय महत्वाचा टप्पा आहे, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

राज्य शासनाने ईज ऑफ लिव्हिंग आणि ईज ऑफ डुईंग बिझनेस धोरण स्वीकारले आहे. महाभूमी स्टॅक प्रणाली या धोरणाच्या अनुषंगानेच आहे. महसूल विभागाने या प्रणालीचा अतिशय प्रभावीपणाने वापर करावा, त्याचबरोबर नागरिकांनी या सेवेचा लाभ घ्यावा, यासाठी विशेष प्रयत्न करावे, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले.

**महाभूमी स्टॅक प्रणाली अभिलेखांचे डिजिटल भांडार -**

३.५ कोटींहून अधिक अधिकार अभिलेख (७/१२ व ८-अ)

१.५ कोटीहून अधिक भू-नकाशे व मिळकत पत्रिका

४० कोटींहून अधिक ऐतिहासिक स्कॅन केलेले फेरफार व जुने अभिलेख

नोंदणी विभागाचे दस्त क. २ च्या प्रती व महसूल न्यायालयीन प्रकरणांची अद्ययावत स्थिती

**प्रणालीचे प्रमुख वैशिष्ट्य -** ग्रामीण भागासाठी सर्व्हे/गट क्रमांक आणि शहरी भागासाठी सी.टी.एस./सिटी सर्व्हे क्रमांक टाकताच, त्या विशिष्ट भू-खंडाशी संबंधित सर्व माहिती एकत्रित स्वरूपात प्राप्त होणार.

त्या भू-खंडाचे सध्याचे वापरकर्ते व अधिकार अभिलेख (७/१२)

त्या भू-खंडावर झालेले मागील सर्व फेरफार

त्या भू-खंडाशी संबंधित नोंदणीकृत व्यवहार संदर्भ (दस्त क्र. २)

भूमापन विषयक माहिती, गाव नकाशा व मोजणी तपशील उपलब्ध होणार

नागरिकांना होणारे फायदे - व्यवहारातील पारदर्शकता व फसवणुकीस आळा: कोणताही भू-खंड खरेदी-विक्रीपूर्वी नागरिक स्वतः च मोबाईलवर पडताळणी करू शकतात की, त्या भू-खंडाचे सद्य वापरकर्ते कोण आहेत, त्यावर कोणते बोजे आहेत का, कोणती न्यायालयीन प्रगती आहे का. यामुळे मध्यस्थांवरील अवलंबित्व कमी होईल.

एकच खिडकी, अनेक सेवाः ७/१२ उतारा, ८-अ उतारा, नकाशा, फेरफार स्थिती, मोजणी अर्ज, दस्त शोध अशा विविध सेवांसाठी वेगवेगळ्या पोर्टलवर आणि कार्यालयांमध्ये जाण्याची आवश्यकता राहणार नाही.

वेळ, श्रम व खर्चाची बचतः आवश्यक असलेले सर्व भूमी अभिलेख घरबसल्या उपलब्ध होतील. बँक कर्ज किंवा इतर शासकीय योजनांसाठी हेच अभिलेख डिजिटल पद्धतीने सुरक्षितपणे सामायिक करता येतील.

ग्रामीण व शहरी दोन्ही क्षेत्रांसाठी समान सुविधाः ग्रामीण नागरिकांना गट क्रमांकाने तर पुणे, मुंबईसारख्या शहरी भागातील नागरिकांना सी.टी.एस. क्रमांकाने त्यांच्या मिळकतीची माहिती सहज शोधता येईल.

प्रशासन, संस्थांसाठी लाभ : - महसूल प्रशासनास पडताळणी व निर्णय प्रक्रिया अधिक गतिमान करता येईल. बँका व वित्तीय संस्थांना कर्ज मंजुरीपूर्वी भू-खंडाच्या वापरकर्त्यांची व व्यवहाराची त्वरित खातरजमा करता येईल. उद्योग व गुंतवणूकदारांना भूमी विषयक स्पष्टतेमुळे गुंतवणूक करणे अधिक सुलभ होईल.

प्रणालीची वाटचाल : - महाभूमी स्टॅकचा विकास उघ्ए आधारित भू-दृश्यीकरण, कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित शोध सुविधा आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रणालींशी एकात्मीकरण दिशेने करण्यात येणार. प्रणाली आंतरविभागीय डिजिटल प्रशासनासाठी एक सक्षम व्यासपीठ ठरणार आहे.